मंगळवार, २४ जानेवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१५४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 24 JANUARY 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-154 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

## चर्चेतली बातमी

### राजस्थानात काँग्रेसची अंतर्गत खदखद कायम

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यात सुरू असलेल्या सत्तासंघर्षादरम्यान, सोमवारपासून राजस्थान विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार आहे. राज्यपाल कलराज मिश्रा सकाळी ११ वाजता विधानसभेत अभिभाषण करतील. त्यानंतर मुख्यमंत्री अशोक गेहलोत हे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही महत्त्वाच्या घोषणा करण्याची शक्यता आहे. बुधवारी अशोक गेहलोत यांनी कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींसोबत अर्थसंकल्पपूर्व बैठक घेतली. या बैठकीत गेहलोत यांनी सचिन पायलट यांचा उल्लेख कोरोना व्हायरस असा केल्याचा आरोप आहे. बैठकीदरम्यान एका प्रश्नाला उत्तर देताना गेहलोत यांनी कोणाचंही नाव न घेता म्हटले, मी लोकांना भेटायला सुरुवात केली आहे याआधी करोना आला होता आता मोठा कोरोनाही आपल्या पक्षात शिरला. गेहलोत आणि पायलट यांच्यातील सत्तासंघर्षामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनातही याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे. त्यांच्यातील वाद मिटवण्याचा अनेकदा प्रयत्न झाला आहे. काही वेळा दोन्ही नेत्यांनी एकमेकांना सहकार्य केले.

# राज्यपाल राजीनामा देणार

## कोश्यारी यांनी पंतप्रधान मोदींकडे व्यक्त केली इच्छा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत. नुकत्याच झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई भेटीत आपण राजकीय जबाबदारीतून मुक्त होऊन जीवनातील उर्वरित काळ अध्ययन, मनन व चिंतनात व्यतीत करु इच्छितो अशी इच्छा त्यांच्याकडे व्यक्त केली असल्याची माहिती राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज येथे दिली. या संदर्भात राजभवनाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकातून राज्यपाल कोश्यारी यांनी ही माहिती दिली.**



महाराष्ट्रासारख्या संत, समाजसुधारक आणि शूरवीरांच्या महान भूमीचा राज्यसेवक, राज्यपाल होण्याचा बहुमान मिळणे हे माझ्याकरिता अहोभाग्य होते. गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ राज्यातील जनसामान्यांकडून मिळालेले प्रेम आणि आपुलकी कधीही विसरता येणार नाही. माननीय पंतप्रधानांच्या नुकत्याच झालेल्या मुंबई दौऱ्यात आपण राजकीय जबाबदाऱ्यांमधून मुक्त होऊन जीवनातील उर्वरित काळ अध्ययन, मनन व चिंतनात व्यतीत करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. माननीय पंतप्रधानांचा विशेष स्नेह आपणास नेहमीच लाभत आला आहे, आणि आशा आहे की या संदर्भात देखील मला त्यांचा आशिर्वाद मिळत राहील, असे राज्यपाल कोश्यारी यांनी आपल्या मनोगतामध्ये म्हटले असल्याचे राजभवनाने आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.



# मोबाईलद्वारे नोंदवा ई-पीक माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**हरिदास सराटे**

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी सजा अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांनी स्वतः आपल्या शेताच्या बांधावर जाऊन रब्बी हंगामातील पीक माहिती नोंदवा आपल्याच मोबाईल द्वारे! आपल्या शेतातील उभ्या पिकांची नोंद ई-पीक पाहणी मोबाईल ॲपवर करा व नोंदविलेली पीक माहिती थेट सातबारा वर मिळवा. शेतकरी बांधवांनो ई-पीक पाहणी मोबाईल ॲप डाऊनलोड करा व आपल्या पिकांची नोंद स्वतः करा आपल्याच मोबाईल द्वारे आपल्याच शेतातून.

ई-पीक पाहणी मोबाईल ॲप शेतकऱ्यांसाठी नक्कीच वरदान ठरत आहे. खुलताबाद तालुक्यातील सावंगी बाजार मंडळातील शेतकरी बांधवांचा ई-पीक पाहणी मोबाईल ॲपला मिळणारा प्रतिसाद हा अत्यंत कमी असल्याने तलाठी सायली विटेकर यांनी रविवारी प्रत्येक शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांमध्ये याबाबत जनजागृती करून त्यांच्या मोबाईल द्वारे स्वतः पिकांची नोंद करून घेतली.

ई-पीक पाहणी मोबाईल ॲप डाऊनलोड करून सर्व शेतकरी बांधवांनी रब्बी हंगामातील पीक माहिती स्वतः आपल्याच बांधावरून नोंदवा, असे आवाहन तलाठी सायली विटेकर यांनी केले.

### उद्योगांपाठोपाठ महाराष्ट्रातील वन्यप्राणीही गुजरातमध्ये रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रातले उद्योग गुजरातला देण्याची उदारवृत्ती महाराष्ट्र सरकारने दाखवली आणि दाखवत आहेत. पण आता हेच सरकार महाराष्ट्रातील वन्यप्राणी देखील गुजरातला पाठवण्याची उदारवृत्ती दाखवत आहेत. हत्तींपासून सुरु झालेला हा प्रवास आता वाघ आणि बिबट्यांपर्यंत येऊन पोहचला आहे. गोरेवाडा प्रकल्पातील चार वाघ आणि चार बिबट कुणालाही कानोकान खबर लागू न देता शनिवारी रात्री गुजरातला रवाना करण्यात आले. त्यामुळे सध्या महाराष्ट्रात हल्लेखोर असण्याच्या नावाखाली सुरू असलेली वाघ आणि बिबट्यांची धरपकड गुजरातसाठीच तर नाही ना, असा वास यायला लागला आहे. काही दिवसांपूर्वी गोरेवाडा प्रकल्पातून दोन वाघ संजय गांधी राष्ट्रीय उद्यानासाठी नेण्यात आले. मात्र, हे वाघ नेताना गुजरातमधील जामनगरमधील एका मोठ्या उद्योगपतीच्या खासगी प्राणीसंग्रहालयातील काही अधिकारी गोरेवाडा प्रकल्पात आले होते. ज्या वाघांची निवड झाली होती, ज्यावर केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाने शिक्कामोर्तब केले होते, ते न नेता इतर वाघ नेण्यात आल्याचे गोरेवाडा प्रकल्पातील सूत्रांनी सांगितले. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानासाठी वाघ नेले जात असताना गुजरातच्या या खासगी प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाचे अधिकारी तेथे काय करत होते, हाही प्रश्न त्यावेळी उपस्थित झाला. आताही त्याच प्रकारची पुनरावृत्ती केली जात आहे. केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाने शिक्कामोर्तब केलेल्या वाघ आणि बिबट्यांना न नेता इतर नेण्यात आले. या खासगी प्राणीसंग्रहालयासाठी प्रसिद्ध "साहेबराव" या वाघावर शिक्कामोर्तब प्राधिकरणाने केले होते. मात्र, "साहेबराव" ला नेण्यातच आले नाही. केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या नियमांचे उल्लंघन करण्यात आल्याची चर्चा आहे.

# लासूर स्टेशनला रेल्वे गेटमुळे अर्धा तास खोळंबली अंत्ययात्रा

## लोकप्रतिनिधी, प्रशासनाची उड्डाणपूलासाठी उदासीनता; ब्रिटिसकालीन झाडांची कत्तल वांझोटी


आधुनिक केसरी न्यूज

गुलाब वाघ

गंगापूर : गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील रेल्वे गेट असून अडचण नसून खोळंबा झाला आहे मात्र रविवारी या रेल्वे गेटवर मृत्यूही ओशाळला असेल असे चित्र पाहवायस मिळाले रेल्वे रुळाच्या पलीकडील पंचशीलनगर येथे राहणाऱ्या प्रेमलता बिरेंद्र सिहं (वय/वर्ष 62)या महिलेचा रविवारी वृद्धापकाळाने मृत्यू झाल्याने दुपारी अकरा वाजेच्या अंत्ययात्रा निघाली होती मात्र पंचशीलनगर येथून स्म्शानभूमीकडे जाताना रेल्वे फाटक ओलांडवे लागते नेमके अंत्ययात्रा रेल्वे फटकाजवळ आल्यावर औरंगाबादकडून मराठवाडा पॅसेंजर रेल्वे येणार असल्याने फाटक बंद झाले ते तब्बल अर्धा तास बंद राहिले कारण पुन्हा मनमाडकडून एक रेल्वे मालगाडी येणार असल्याने क्रॉसिंग होती मात्र यामध्ये अंत्ययात्रा तब्बल अर्धा तास एकाच जागी ताटकळत उभी राहिली त्यातच आठवडी बाजार असल्याने बाजारासाठी येणाऱ्या लोकांचीही एकच गर्दी गेटवर पडली त्यामुळे अंत्ययात्राला खूप उशीर झाला. जाताना सरणावर इतकेच मला कळले होते, मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते या कवी सुरेश भट्ट यांच्या कवितेच्या काव्यपंगतीप्रमाणे दुर्दैवी घटका त्या मृत आत्म्यावर आली असावी कीं काय असा प्रश्न उपस्थित करून लासूर स्टेशन सह जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वामुळे प्रेतलाही अश्रू ढाळावे लागत असतील तर याचा दोष कोणाला असा यक्षप्रश्न पुन्हा एकदा वर आला असून आत्तातरी राजकारणी धुरंधरांनी वैयक्तिक हेवेदावे बाजूला ठेऊन किमान भूमिगत पूल करण्यासाठी एकत्र येऊन प्रयत्न



करण्याची कळकळीची मागणी नागरिकांतून होत आहे दरम्यान तीनचार वर्षापूर्वी उड्डाणंपुल होणार म्हणुन सावंगी चौक ते रेल्वे गेटपर्यंत ब्रिटिशकालीन महाकाय असलेल्या अनेक झाडांची कत्तल ठेकेदारांनी केली हाती मात्र या उड्डाणपूलाच्या कामाला माशी शिंकली व मंजूर असलेला उड्डाणपुल रद्द झाला व पुन्हा एकदा भुयारी पूल होणार असल्याचे गाजर लासुरकरांना मिळाले मात्र अजूनही उड्डाणंपुल झाला ना भुयारी पूल झाला मात्र हे रेल्वे फाटक बंद झाल्यावर अंबूलन्स अडकून अनेक रुग्णांना जीव गमवावा लागलेला आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# तीर्थ, तीर्थरूप आणि तीर्थक्षेत्र...

आधुनिक केसरी

जसे तीर्थ म्हणजे पवित्र, अभिमंत्रित जल, तसेच क्षेत्र याचा अर्थ ठिकाण, जागा किंवा परिसर. अशी पवित्र ठिकाणे आणिज्या ठिकाणचे जलाशय गुरूंच्या किंवा परमेश्वराच्या पदस्पर्शाने किंवा वास्तव्याने पुनीत झाले आहेत, ते ठिकाण तीर्थक्षेत्र होते. श्रीकृष्णाने गीतेच्या तेराव्या अध्यायात क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ याबद्दल सांगितले आहे. ते अध्यात्मिक किंवा पारमार्थिक अर्थाने. आपले शरीर म्हणजे क्षेत्र आणि त्याला जाणणारा आणि त्यात निवास करणारा तो क्षेत्रज्ञ म्हणजेच आत्मा हा परमेश्वरस्वरूप आहे असा त्याचा अर्थ आहे. हे जो जाणेल, त्याचे शरीर आणि मन तीर्थक्षेत्रासमान पवित्रच असेल असा त्याचा अर्थ. काशी क्षेत्री गंगा, यमुना आणि सरस्वती या पवित्र नद्यांचा त्रिवेणी संगम असल्याने आणि भगवान शंकराचा निवास असल्याने ते असे तीर्थक्षेत्र झाले आहे. तसेच नासिक हे तीर्थक्षेत्र राम , लक्ष्मण आणि सीता यांच्या पावन पदस्पर्शाने आणिगोदावरीच्या पवित्र जलाने पावन झाले आहे. अशी अनेक परम पवित्र तीर्थक्षेत्रे भारतात जागोजागी आहेत. पूर्वी आणि आताही यात्रेकरू या पवित्र तीर्थक्षेत्रांचं दर्शन घेण्यासाठी तीर्थयात्रा करतात. या सगळ्या तीर्थक्षेत्रांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ती निसर्गरम्य ठिकाणी आहेत. त्यातील काही क्षेत्रे आता त्या ठिकाणी दाट मानवी वस्ती झाल्याने पूर्वीसारखी निसर्गरम्य राहिली नाहीत हा भाग वेगळा. तीर्थक्षेत्री ज्या ज्या वेळी यात्रा भरते किंवा एखादा पवित्र दिवस असतो, त्या दिवशी आणि सुट्यांच्या दिवसात प्रचंड गर्दी अलीकडे होऊ लागली आहे. अशा गर्दीच्या वेळी तेथे जाणे कितपत योग्य हे ज्याचे त्याने ठरवावे. मात्र गर्दीच्या वेळा टाळून जर आपण तेथे गेलो तर दर्शन तर निवांत होतेच पण तेथील परिसरही छानपैकी न्याहाळता येतो. या तीर्थयात्रेच्या निमित्ताने महाभारतातील एक कथा आठवली. महाभारतातील युद्ध नुकतेच संपलेले असते. युद्ध संपले असले तरी भीम, अर्जुन आपण युद्धात कसा पराक्रम केला त्याच्याच गोष्टी करीत असतात. **क्रमश :**





# आनंदी पहाट

## विचारवंतांच्या शोधात राहावे

आधुनिक केसरी

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अनेकदा आपले मन जुने सोडायला, विसरायला तयार नसते, तसेच ते नव्याची नवलाई देखील अनुभवू पाहत असते. खरे तर इथेच आपल्यातील निवड कौशल्याचे कसब दिसून येत असते. आपले अंतर्मन सौदर्याच्या संकल्पनांना नवी दिशा मिळवून देण्याच्या प्रयत्नात असते. नवे काहीतरी हवे असे म्हणणारे एक मन एका दिशेने, तर जुने ते सोने म्हणणारे दुसरे मन त्याच्या अगदी विरुद्ध दिशेने विचार करत असते. असे जरी असले तरीही, प्रयोगशील मनाला नावीन्याची अनुभूति हवी असते, मग ते नव्याचाच अंगीकार करते. आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. त्यासाठी एक हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. अगदी प्राचीन काळापासून आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसे विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्रारंभापुरते निमित्तच ठरत असते. आयुष्याच्या प्रवासात सोबत हवी असते, ती विचारांचीच.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**संत सेवा चित्ती | नांदो देवा ||**

**कर्मावीन नाही | सुटका देहाची ||**
**परी सत्कर्माची | साथ हवी ||१||**
**संगतीने वाढे | कर्माचे फलित ||**
**जाण सत्संगात | ब्रह्म सुख ||२||**
**ध्यानी ठेव मना | नाशाचे कारण ||**
**पापाचे पोषण | कुसंगती ||४||**
**उत्तम ते वर्म | भाव शुद्ध कर्म ||**
**जागावा स्वधर्म | अखंडीत ||४||**
**जैसी ज्याची श्रध्दा | तैसी त्याची वृत्ती ||**
**संत सेवा चित्ती | नांदो देवा ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

**होईल सूर्योदय हे निश्चित; कधी लवकर कधी उशीरा. तू मात्र सूर्य शोधणे सोडू नकोस. खलाशांना तर याच स्वभावामुळे अनेक मार्ग, देश गवसले आहेत.**

**किती गंमत आहे पहा- विकासाला दिशा असते, क्रम असतो, कारण असते पण मर्यादा मात्र नसते.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

**मनमुख जिव सुख ना मिले, मन अरि रह नित साथ । जग जीवन भरमावता, सद्गुरु शरण सनाथ ।।०२।। (स्वर्वेद तृतीय मण्डल प्रथम अध्याय) ०३/०१/०२**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

जीवाचा (आत्म्याचा) शत्रू मन आहे. तो अनेक जन्मांपासून जीवाबरोबर आहे. मनाच्या नाना प्रकारच्या आशा, वासनांनी जीव बांधला गेला आहे. जोपर्यंत मनाच्या प्रपंचांपासून जीव अलग होत नाही तोपर्यंत शांती मिळू शकत नाही. मनाच्या अनुकूल चालण्याने जीवाला सुख कधीच मिळणार नाही. मन जीवाला सदैव आपल्या जाळ्यात अडकवून त्याला नाना प्रकारच्या दृश्यांकडे घेऊन जाते आणि आत्म्याला दुःखी करते. म्हणून मनाला सोडून जीवांचे नाथ असलेल्या सद्गुरूंना शरण जाऊन आत्म्याच्या अनुकूल अध्यात्मिक जीवन निर्माण करून सुख शांती प्राप्त केली पाहिजे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# भवसागर तरून जाण्यासाठी नाम हेच साधन

आधुनिक केसरी

नाम हे स्वतःसिद्ध आहे म्हणूनच ते अत्यंत उपाधिरहित आहे. नाम घेताना आपण पुष्कळदा त्याच्या मागे उपाधी लावतो; उदाहरणार्थ, आपण ऐहिक सुखाच्या प्राप्तीकरिता नाम घेतो; किंवा, मी नाम घेतो ही अहंकाराची भावना बाळगतो. या उपाधीमुळे आपल्या प्रगतीला बरेच अडथळे येतात. म्हणून नामाकरिताच नामस्मरण करावे, आणि तेही सद्‌गुरूच आपल्याकडून करवून घेतात या भावनेने करावे. त्या योगाने अहंकार नष्ट होऊन शरणागती येईल. शरणागती यायला रामनाम हाच रामबाण उपाय आहे, तो आपण करावा. नामाचा महिमा वाचेने सांगणे अशक्य आहे, पण हे सांगण्याकरिता तरी बोलावे लागते इतकेच. मनुष्यप्राणी भवसागरात गटांगळ्या खातो आहे; समुद्रातून तरून जाण्यासाठी जशी नाव, तसे भवसागरातून तरून जाण्यासाठी भगवंताचे नाम आहे. फक्त एकच दक्षता घेणे जरूर आहे, ती ही की, नावेत समुद्राचे पाणी येऊ देऊ नये, नाहीतर नावेसकट आपण बुडून जाऊ; त्याप्रमाणे, संसाररूपी समुद्राचे पाणी नामरूपी नावेत येऊ देऊ नये. म्हणजे, कोणत्याही प्रापंचिक अडचणीमुळे नामात व्यत्यय येऊ देऊ नये. तसेच, नामाचा उपयोग संसारातल्या अडचणी दूर होण्याकरिता व्हावा ही बुद्धी न ठेवता नामाकरिताच नाम घ्यावे, म्हणजे नावेत पाणी न शिरता सुखरूपपणे पैलतीराला म्हणजे भगवंतापर्यंत पोहोचता येते.



कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. देह केव्हा जाईल याचा नेम नाही, मग म्हणून म्हातारपणी नामस्मरण करू असे म्हणू नये. अगदी उद्यापासून नामस्मरण करू म्हटले, तर उद्याची तरी खात्री आहे का ? आयुष्य क्षणभंगुर आहे ही खात्री प्रत्येकाला आहे, म्हणून तर प्रत्येकजण आयुष्याचा विमा उतरवतो. लग्नाला आलेल्या पाहुण्याला लग्न कसे पार पडेल याची काळजी नसते, पण घरातल्या माणसाला फार काळजी वाटते. आपल्या प्रपंचात आपण पाहुण्यासारखे वागू या. देहादिक सर्व रामाला अर्पण करून निश्चिंत होऊ या. सोन्यामोत्याचे दागिने घालणारी श्रीमंताची बाई असू द्या, बेताचे लहान दागिने घालणारी मध्यम स्थितीतली बाई असू द्या, किंवा चांदीची जोडवी आणि नुसते मंगळसूत्र घालणारी अगदी गरिबाची बाई असू द्या, त्या सर्वांना कुंकू ज्याप्रमाणे सारखेच असते, त्याप्रमाणे कसलाही भेद न ठेवता नाम हे सर्वांना सारखेच साधन आहे. सूर्य हा फक्त प्रकाश देतो, पण त्यामुळे अंधार आपोआप नाहीसा होतो. तसेच नाम हे भगवंताचे प्रेम वाढविते; मग आपले दोष आपोआपच नाहीसे होतात. भगवंताचे अस्तित्त्व आपल्याला जास्त पटत चालले, किंवा भगवंताच्या कर्तृत्वाची साक्ष जास्त जास्त अनुभवास येऊ लागली, की परमार्थामध्ये आपली प्रगती झाली असे समजावे.. **आजचे बोधवचन आहे - जगण्याकरता श्वास घेणे जसे मनुष्यास जरूरीचे आहे, तसेच भगवंताच्या भेटीसाठी प्रत्येक श्वासाबरोबर नाम घेणे अगत्याचे आहे.**

# बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

कारणं देहबुद्धीचा अडसर घेऊन जर कोणी स्वस्वरूपाकडे जाईल त्याला अंतीम ध्येयापर्यंत जाता येत नाही. कारणं मी पणाचा अहंकार त्याच्या ठिकाणी सतत वास करत असतो. म्हणून समास लिहिताना सुरवातीलाच मी म्हणाले आहे की अहंकार हा माणसाचा सर्वात मोठा शत्रु आहे. सत्व,रज,तम हे तीन गुणांनी बंधन तयार होते. स्वस्वरूपाच्या ठिकाणी या तीनही गुणांना काही किंमत नसते. अहंकार त्याग ही शुन्यत्वाची पहिली पायरी आहे. ।। मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ।गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम् ।। वरील श्लोकाचा अर्थ आता पाहुया. बध्द आणि मुक्त हे वर्णन गुणांच्या साठी लागू पडते. आत्मवस्तुच्या बाजूने विचार केला तर ते खरे नाही. म्हणून आत्मस्वरूपाला जसे बंधन नाही तसे बंधनातून मुक्त होणे पण नाही। जो अत्यंत शुध्दब्रम्हज्ञानी असतो त्याच्या जवळ बध्द आणि मुक्त हा भेदच नसतो. रज,तम,सत्व याला कुरवाळत बसणारे जे लोक आहेत त्यांच्या कडे याचा भ्रमाचख साठा असतो.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**मुगुट माथां कोटि सूर्यांचा झळाळ । कौस्तुभ निर्मळ शोभे कंठीं ॥२॥**
**ओतींव श्रीमुख सुखाचें सकळ । वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी ॥३॥**
**उद्धव अक्रूर उभे दोहींकडे । वर्णिती पवाडे सनकादिक ॥४॥**

# जीवन घडवण्यासाठी स्वत:ला गाडून घ्यावे लागेल : प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये

## स्व.मोहनलाल बियाणी स्मृती व्याख्यान मालेचे सहावे पुष्प उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी : जो आधी छन्नी-हातोडयाचे घाव सोसतो त्याचाच पुढे जयजयकार होतो. त्यामुळे जीवन घडवण्यासाठी स्वतःला गाडून घ्यावे लागेल, असे प्रतिपादन परभणी येथील बालविद्या मंदिर विद्यालयात स्व.मोहनलाल बियाणी स्मृती व्याख्यान मालेचे सहावे पुष्प गुंफतांना प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये यांनी केले.**





मागील पाच महिन्यापासून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मा. वसंत मुंडे, मराठवाडा साथीचे मुख्य संपादक मा. चंदूलाल बियाणी आणि दै.आधुनिक केसरीचे संपादक मा. डॉ. प्रभू गोरे यांच्या संकल्पनेतून या व्याख्यानमालेत अनेक सुप्रसिद्ध व्याख्याते, विचारवंत यांची व्याख्याने महाराष्ट्राच्या विविध शहरात संपन्न झाली आहेत. त्यामध्ये आज दिनांक 23 जानेवारी सोमवार रोजी सहावे पुष्प गुंफतांना महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत, लेखक, कवी, व्याख्याते, प्रबोधनकार प्रा. डॉ.विठ्ठल जायभाये 'आम्ही शिल्पकार उद्याच्या भारताचे!" या विषयावर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अरूण बोराडे तर दैनिक मराठवाडा साथीचे मानद संपादक श्री नितीन धुत यांची विशेष उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.जायभाये म्हणाले की, मानवी जीवन अनमोल आहे. माणसाने लाभलेले जीवन कठीण परिश्रम करून सार्थक करायला हवे. आत्तापर्यंत सर्वच महापुरुषांनी स्वतःला गाडून घेऊन आपल्या जीवनाचा आणि जगाचा उत्कर्ष केला आहे. सोळावे वरीस धोक्याचे नसून ते मोक्याचे आहे. छत्रपती शिवराय, महात्मा ज्योतिराव फुले, स्वामी विवेकानंद, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ. ए.पी. जे.अब्दुल कलाम तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आदी सर्वच महापुरुषांनी अत्यंत कमी वयात मोठी कामे केली आहेत. या महापुरुषांनी जात, धर्म, पंथ, लिंग याच्या पलीकडे जाऊन कार्य केले, त्याचाच परिपाक म्हणजे या महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी साजरी केली जाते. चित्रपटाच्या रीलमधील हिरो हे आपले हिरो नसून वरील उल्लेख केलेले महापुरुषच आपले खरे (रिअल) हिरो आहेत! हेच महामानव आपले नित्य पथदर्शी आहेत. "एका बिजा केला नाश मग भोगीले कणीस " या तुकोबांच्या सुप्रसिद्ध अभंगाप्रमाणे आपले जीवन प्रज्ञा-शील-करुणा यांनी ओतप्रोत भरायचे असेल तर कठीण परिश्रम, अहोरात्र अभ्यास याला पर्याय नाही. यशाला कधीच, कुठेच शॉर्टकट नसतो, त्याला हार्डवर्क हा एकमेव पर्याय आहे! त्याचबरोबर विविध कथा आणि सुभाषिते सांगून डॉ.जायभाये यांनी मुलांना आणि तमाम श्रोत्यांना तब्बल एक ते सव्वा तास खिळवून ठेवले. अधून मधून मुलांना बोधकथा आणि प्रश्न विचारून आपल्या व्याख्यानात सामावून घेत, हसत-खेळत आपल्या सुंदर आणि प्रेरणादायी विचारांची पेरणी करतांना हे व्याख्यान परभणीत नाही तर मुंबई सारख्या शहरात एखाद्या भव्यदिव्य कार्यक्रमात बसल्याची अनुभूती श्रोत्यांना आल्याचे बोलले गेले. मराठी भाषा पंधरवडा आणि त्यात डॉ. जायभाये यांचे व्याख्यान संपन्न झाल्याने खऱ्या अर्थाने या व्याख्यान मालेची व्यापकता विस्तीर्ण होत आहे याची पुरेपूर जाण झाली. याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक श्री अरूण बोराडे यांनी शाळेच्या गौरवशाली परंपरेवर प्रकाश टाकत स्व.डॉ.पांडुरंग नावंदर यांच्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाला पर्यवेक्षक रामदास तुगगेवार, बळीराम कोपरटकर, सुभाष ढगे, लेखक रामकृष्ण जोशी, आधुनिक केसरीचे व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी, संदीप घंटे, राजस्थानी मल्टीस्टेटचे शाखा व्यवस्थापक एस.एस.चोभारकर,आर. बी.देशमुख, सौरभ साकला, पी.बी.हुरगुळे, एम.व्ही. तायडे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन दै. आधुनिक केसरीचे संपादक डॉ.प्रभू गोरे यांनी तर आभार प्रदर्शन सुभाष ढगे यांनी केले.

# खिर्डीच्या सरपंचांना मनमानी भोवली

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील खिर्डी येथील सरपंच ज्ञानेश्वर मातकर हे ग्रामपंचायत सार्वत्रीक निवडणूक २०२१ ते २०२५ या कार्यकाळांसाठी सदस्य पद या कालावधीसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडलेली होती. त्यामध्ये ज्ञानेश्वर मातकर हे प्रभाग क्रमांक ०३ मधून सर्वसाधारण प्रवर्गातून ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आले होते. व तदनंतर ग्राम पंचायत कार्यकारी मंडळातून, सदस्य निवडणूकीने बहुमताने सदर ग्रामपंचायत मध्ये सरपंच पदी निवड करण्यात आली होती.

सदर सरपंच पदावर निवड झाल्या नंतर त्यांनी सरपंच पदाच्या कर्तव्यात कसूर,गैरवर्तणूक बेकायदेशीर कामे केल्यामुळे त्यांच्या विरोधात सामाजिक कार्यकर्ते सुनील घुसळे यांनी माननीय विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्या न्यायालयात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९(१) नुसार कामात अनियमितता केल्यामुळे व पदाचा दुरुपयोग केल्यामुळे मनमानी कारभार केल्यामुळे सरपंच पद व सदस्य पद रद्द करावे, यासाठी विधीतज्ञ शरद वि.भागडे पाटील यांच्यातर्फे प्रकरण दाखल केले होते. त्यामध्ये त्यांनी ग्रामपंचायत मध्ये १५ वा वित्त आयोगाचा निधी हा ग्रामसभेची मंजुरी न घेता,परस्पर खर्च करणे, परस्पर वारस प्रमाणपत्र देणे, ग्रामविकास निधी हा बँकेत न भरणे, सरपंच पदाला शोभेल असे काम न करणे, तसेच मनमानी कारभार करणे ग्रामपंचायत मध्ये असलेले प्रमाणके (अभीलेखे)१८, १९,२०,२१,२२ हे व्यवस्थित न ठेवणे व ग्रामपंचायत कार्यालयाच्या कामामध्ये भ्रष्टाचार करणे असे अनेक मुद्देंच्या आधारे त्यांच्या विरोधात दोषारोपपत्र म्हणून ठेवण्यात आले होते. त्यामध्ये माननीय अप्पर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद व गटविकास अधिकारी, खुलताबाद यांचा सविस्तर असा स्वयं स्पष्ट चौकशी अहवाल मागून घेण्यात आला. त्यानंतर अपीलकार (अर्जदार) व गैर अर्जदार यांना सुनावणीची समान संधी देण्यात आली.सुनावणी नंतर तक्रारदार यांनी हे सिद्ध केले की,सरपंच ज्ञानेश्वर मातकर यांनी सरपंच पदावर विराजमान झाल्यानंतर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (१) नुसार कामात पारदर्शकता न ठेवता कामकाज केले व कर्तव्यात कसूर केला त्यामुळे त्यांच्या विरोधात ठेवण्यात आलेले दोषारोपपत्र हे सुनावणी वेळी तक्रारदार यांचे विधीतज्ञ शरद वि. भागडे पाटील यांनी सुनावणीमध्ये प्रखर युक्तीवाद करून सिद्ध केले की,ज्ञानेश्वर मातकर यांनी सरपंच पदाचा दुरुपयोग केला व कर्तव्यात कसूर केला, अनियमितता स्पष्ट पणे दिसून येते. त्यामुळे ग्रामपंचायत सदस्य व सरपंच पदावरून पाय उतार होण्याची वेळ आली. व त्यामुळे त्यांचे ग्रामपंचायत सदस्य पद व सरपंच पद हे तात्काळ



विभाग आयुक्त यांच्या न्याय निर्णयाच्या आदेशानुसार रद्द करण्यात आले. या संबंधित प्रकरणातील आदेशामुळे सर्व जिल्हा स्तरावर राष्ट्रवादीचे सरचिटणीस ज्ञानेश्वर मातकर यांचे सरपंच पद रद्द झाल्याची चर्चा ग्रामपातळीवर होत आहे.

# श्याम मानव यांना जीवे मारण्याची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मध्यप्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री महाराज अलीकडे चर्चेत आले आहेत. बागेश्वर बाबा नावाने प्रसिद्ध असलेले धीरेंद्र शास्त्री महाराज लोकांचे मन वाचू शकतात, असा दावा करतात. याला अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक श्याम मानव यांनी बागेश्वर बाबांना थेट आव्हान दिले होते. त्यानंतर आता श्याम मानव यांना जीवे मारण्याची धमकी आली आहे.

दिव्यशक्तीचा दावा करणाऱ्या बागेश्वर बाबांना श्याम मानव यांनी आव्हान दिले होते. बागेश्वर बाबांनी त्यांच्याकडे असणारी दैवीशक्ती सर्वांसमोर दाखवावी. आम्ही त्यांना ३० लाख रुपये देऊ, असे श्याम मानव म्हणाले होते. यानंतर बागेश्वर बाबा नागपुरातील कार्यक्रम अर्ध्यावरच सोडून गेले होते. अशातच आता श्याम मानव यांना जीवे मारण्याच्या धमकीचा फोन आला आहे. या फोननंतर एकच खळबळ उडाली आहे. हा धमकीचा फोन आल्यावर नागपूर पोलिसांनी श्याम मानव यांच्या सुरक्षेत वाढ केली आहे. छतरपूर जिल्ह्यातील प्रसिद्ध बागेश्वर दाम हनुमान मंदिरात रोज हजारो भाविक येत असतात. यात धीरेंद्र कृष्ण शास्त्री महाराज हे कथावाचक आहेत. ते अचानक प्रसिद्धीझोतात आले आहेत. बागेश्वर बाबांचा जन्म बागेश्वर गढा गावात झाला होता.

# गावात नाही झाडी, तरी विकणार शिंदी-ताडी : ग्रामस्थ आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** देगलूर तालुक्यातील शिंदी - ताडी विक्रेता आपले देगलूर मधील बस्तान गुंडाळून धर्माबाद (रत्नाळी) येथे आपला संसार थाटण्याच्या तयारीत असल्याचे विश्वासनीय सूत्रांकडून माहिती मिळाली.मात्र धर्माबाद तालुक्यातील चेरलेवार यांचे शिंदीचे बन वगळता एकही झाड नाही तरीही उत्पादन शुल्क विभागाने यांना स्थलांतराचा परवाना दिलाच कसा? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

धर्माबाद, रत्नाळी परिसरातील अनेक तरुण, महिला, बालके शिंदच्या व्यसनाच्या आहारी गेले आहेत. त्यातील काही जणांनी नशेतच आत्महत्या केली आहे.परिणामी अनेकांचे संसार उद्धवस्त झाले आहेत. मुळात शिंदी ताडी विक्रेते लोकांना झाडाची शुद्ध निरा न देता शिंदीच्या नावाखाली गुलफार्म मिक्स करून नशिले विष विकतात. हे पेय स्वस्त असल्यामुळे, पिण्यास चव कडू नसल्याकारणाने अल्प दरात नशा होते. कामगार स्त्री - पुरुषांना आपला थकवा दूर झाल्याचा फिल येतो.तर तरुणांना शौक पूर्ण झाल्याचा अल्पकालीन आनंद मिळतो.त्यातून ते या नशेच्या चक्रव्युहात गुरफटत जातो.यातून बाहेर निघण्याचा मार्ग सापडला नाही की लोक वेडसरपणा करून आपले जीवन संपवितात. तरीही केवळ आपल्याला या व्यवसायात अमाफ पैसा कमवितात येतो यासाठी लोकांचे जीव धोक्यात टाकून रत्नाळी येथे शिंदी भट्टी चालू करण्याचा अट्टहास केला जात आहे. उत्पादन शुल्क विभागाने नियम धाब्यावर बसवून स्थलांतराला परवानगी दिलीच कशी? या परिसरात यशवंत विद्यालयाचे वसतिगृह आहे तसेच कुंभार समाजाचे मंदिर आहे.असे असताना उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी जाय मोक्यावर जाऊन पाहणी केली का? केली असेल तर परवानगी कशी दिली? ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नगर परिषदेची परवानगी घेतली का? लोकांच्या जिवांशी खेळण्याचे पाप कोण करत आहे? प्रशासन, उत्पादन शुल्क विभाग की शहरातील / गावातील शुक्राचार्य? रत्नाळी गावातील जागरूक तरुणांमध्ये याविषयीं तीव्र संताप आहे. गावकऱ्यांनी एकजूटीने या भट्टीस विरोध केला पाहिजे अशी भावना सोशल मीडियातून व्यक्त होत आहे.

गावात व तालुक्यात नाही झाडी तरी विकली जाणार शिंदी माडी यामुळे लोकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. उत्पादन शुल्क विभाग व शिंदी विक्रेता यांच्यात मिलभगत असल्याशिवाय हे शक्य नाही अशी चर्चा गावाकऱ्यात रंगत आहे.स्थानिक पूढारी, आमदार - खासदार नेमकी काय भूमिका घेतात हे बघणे उत्सुकतेचे असेल.



1) प्रस्तुत पार्श्वभूमीवर नगर परिषदेस मुख्याधिकारी नीलम कांबळे यांच्याशी संपर्क साधून या शिंदी विक्रेत्याने नगर परिषदेची परवानगी घेतली का? या विषयी चौकशी केली असता त्यांनी 'नाही' असे स्पष्ट शब्दात सांगितले. नगर परिषदेची परवानगी नसताना, गावाकऱ्यांची सहमती नसताना कशाच्या बळावर हा भट्टी चालक हिंमत करत आहे?

2) शिंदीच्या व्यसनामुळे आमच्या गावातील अनेक तरुणांचा हाकनाक बळी गेला असून आम्ही ही शिंदी भट्टी चालू होऊ देणार नाहो .वेळ प्रसंगी महिला घेऊन आम्ही रस्त्यावर उतरुन आंदोलन करू . ग्रामस्थ, युवकांनी व समस्त गावकरी आपली भावना व्यक्त केली आहे .

# कोणाची अधिक ताकद ?

आधुनिक केसरी

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी शिवसेनेबरोबर युती करण्याचे यापूर्वीच जाहीर केले होते. त्यानुसार ही युती आता आकारला येत आहे. परंतु या युतीचा मुंबईत शिवसेनेला किती फायदा होईल याबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. मुंबईत रामदास आठवले यांचा रिपब्लिकन पक्ष की प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीची ताकद अधिक, असा प्रश्न नेहमी विचारला जातो. प्रकाश आंबेडकर यांनी अकोला जिल्ह्यात अधिक लक्ष केंद्रित केले. अकोला जिल्हा परिषदेत या पक्षाला सत्ता मिळाली. याशिवाय दोन आमदार मागे निवडून आले होते. अकोल्याचा अपवाद वगळता वंचित बहुजन आघाडीला राज्याच्या अन्य भागात राजकीय प्रभाव पाडता आलेला नाही किंवा राजकीय यशही प्राप्त झालेले नाही. यालउट रामदास आठवले यांनी मुंबई, ठाणे, नवी मुंबईवर अधिक लक्ष केंद्रीत केले होते. आठवले यांच्या पक्षाला निवडणुकीत मर्यादित यश मिळाले असले तरी मुंबईच्या दलित वस्त्यांमध्ये आठवले यांच्या पक्षाचा प्रभाव जाणवतो. ही मते निर्णायक असतात आणि आठवले यांच्या आदेशानुसार मतदान होत असते. मुंबई महानगरपालिकेच्या २०१२ मध्ये झालेल्या निवडणुकीत शिवशक्ती-भीमशक्तीचा प्रयोग करण्यात आला होता. तेव्हा रामदास आठवले यांनी शिवसेनेबरोबर हातमिळवणी केली होती. आठवले गटाची मते तेव्हा शिवसेनेकडे काही प्रमाणात वळली होती. शिवशक्ती आणि भिमशक्तीतील जुन्या संघर्षामुळे दोन्हीकडे काही प्रमाणात आक्षेप होतेच. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने शिवसेनेने वंचित बहुजन आघाडीबरोबर हातमिळवणी केली आहे. प्रकाश आंबेडकर यांना मानणारा वर्ग मोठा आहे. पण मतांमध्ये किती फरक पडतो याबाबत आताच अंदाज वर्तविणे कठीण आहे. भाजप की शिवसेना हा पर्याय समोर असल्यास दलित समाज हा शिवसेनेला कौल देईल, असे शिवसेना नेत्यांचे गणित आहे.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# महत्त्व गणतंत्र दिवसाचे..

आधुनिक केसरी

**२६ जानेवारी हा भारतात गणतंत्र दिवस म्हणून साजरा केला जातो. नव्या पिढीला या दिवसाचे महत्त्व कितपत माहिती आहे,याबद्दल शंका वाटते. माहिती असली तरी ती तुटक असते.अपुरी किंवा कधी कधी चुकीची असते.त्यामुळे स्वातंत्र्य दिन अन् गणतंत्र दिवस यातील नेमका फरक समजून घेणे गरजेचे आहे.सुरवातीला एक कबूली दिलेली बरी. मी राज्य शास्त्राचा अभ्यासक,तज्ञ नाही. पण स्वतंत्र भारताच्या इतिहासातील महत्वाच्या घटना, त्या मागची पार्श्वभूमी,निर्णय प्रक्रियेतील तात्विक भूमिका तरुण पिढीला ज्ञात हवी.म्हणून हा लेखनप्रपंच.**

३ जून १९४७ रोजी भारताचे विभाजन करून दोन स्वायत्त वसाहत राज्ये म्हणजे DOMINIONS निर्माण करण्याचा निर्णय ब्रिटिश सरकारने जाहीर केला.त्यावेळी मांडलिकअसलेली सुमारे साडे पाचशे संस्थाने भारतात होती. या संस्थांनाना भारत किंवा पाकिस्तान यापैकी एका स्वायत्त वसाहत राज्यात सामील होण्याचे स्वातंत्र्य मिळाले.१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र झाला. म्हणून तो स्वातंत्र्य दिवस.२६ जानेवारी १९५० रोजी आपली घटना लागू झाली.तत्पूर्वी २६ नोव्हेंबर १९४९ ला ही घटना पूर्ण झाली.संविधान तयार करण्याचे काम पूर्ण झाले.हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो.१५ ऑगस्ट ४७ पूर्वी आपण ब्रिटिशांचे COLONY राज्य होतो. ब्रिटेन ची एक कॉलनी होतो.या दिवशी इंडियन इंडिपेंडंस ॲक्ट लागू झाला.सत्तांतर प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत देशात एक हंगामी सरकार काम करणार होते.१९४७ साली मिळालेले स्वातंत्र्य पूर्ण स्वातंत्र्य असले तरी तांत्रिक दृष्ट्या स्वायत्त वसाहतीचा दर्जा कायम असे पर्यंत, आणि भारताची राज्यघटना तयार होऊन तो प्रजासत्ताक गणतंत्र होई पर्यंत ब्रिटिश राज्य घराण्याशी निष्ठेचे ओपचारिक संबंध राहणार होते. व्हाईसरॉय च्या कार्यकारी मंडळाचे भारतीय करण करून त्यांना मंत्री मंडलासारखे अधिकार देण्यात आले.आपल्या संविधान सभेचे काम नोव्हे डिसेंबर ४६ ला सुरू झाले. ते २६ नोव्हेंबर ४९ रोजी पूर्ण झाले,अन् २६ जानेवारी ५० ला लागू झाले.१५ ऑगस्ट ला स्वातंत्र्य मिळाले तरी लॉर्ड माऊंट बॅटन हे २१ जून ४८ पर्यंत गव्हर्नर जनरल म्हणून कारभार बघत होते.त्यानंतर २१ जून ४८ ते २५ जाने ५० चक्रवर्ती राजगोपालाचारी हे भारतीय गवर्नर जनरल होते.१९४९ नोव्हेंबर महिन्यात राज्य घटना संमत होत होती.लगेचच राष्ट्रपती कोण असावे हा निर्णय घ्यायचा होता.भारत खऱ्या अर्थाने गणतंत्र झाल्यानंतर २६ जाने ५० रोजी डॉ राजेंद्र प्रसाद अंतरिम राष्ट्रपती झाले.संविधान सभा हीच अंतरिम संसद म्हणून अस्तित्वात आली.२६ जानेवारीच्या आर्टिकल ३९५ नुसार आधीचे इंडियन इंडिपेंडस ॲक्ट ४७,आणि GOVERNMENT OF INDIA ACT १९३५ हे खारीज झाले.भारत ब्रिटनचा डोमेनियन राहिला नाही.तरी तिन्ही सैन्याचे प्रमुख पद ब्रिटिश जनरलकडे च होते.१५ ऑगस्ट ४७ ला दोन डॉमनियन,भारत,पाकिस्तान अस्तित्वात आले. तरी प्रभुत्व दोघांवरही ब्रिटनच्या राजाचे होते.सत्तांतर सुलभ व्हावे म्हणून संपूर्ण स्वातंत्र्य ऐवजी वसाहतीचे स्वराज्य स्वीकारण्यात आले.त्याचा सैन्य व्यवस्थेवर परिणाम झाला. भारतीय सैन्याच्या वरिष्ठ पदावर ब्रिटिश अधिकारीच राहणार होते. कारण त्या ज्येष्ठतेचे भारतीय अधिकारी आपल्याकडे उपलब्ध नव्हते.स्वातंत्र्य मिळाले तेव्हा सर रॉय बुचर लष्कर प्रमुख होते. नंतर ते आपले सर सेनापती झाले.फिल्ड मार्शल आकिनलेक हे भारत पाक दोन्ही सैन्याचे सुप्रीम कमांडर होते. हे अधिकारी निवृत्त होई पर्यंत भारतीय सेना अधिकारी त्याच्या जागी येणार नव्हते.

२६ नोव्हेबर ४९ रोजी, संविधानाच्या काही तरतुदी ताबडतोब लागू करण्यात आल्या,उदा नागरिकता,निवडणूक संबंधी कायदे, आर्टिकल ३९४..बाकी पूर्ण संविधान अस्तित्वात येऊन भारत खऱ्या अर्थाने गणतंत्र झाला तो २६ जाने ५० ला.या दिवशी आपल्याला पूर्ण स्वराज्य मिळाले असे



म्हणायला हरकत नाही. कारण आता आपला ब्रिटनच्या राजाशी कसलाही संबंध राहिला नाही. आपले अंतरिम राष्ट्रपती हे आपले राष्ट्र प्रमुख झाले.२६ नोव्हेंबर ४९ ला जर संविधान पूर्ण झाले,अस्तित्वात आले तर मग २६ जाने ५० पर्यंत वाट का पहिली गेली? यामागे एक पूर्वेतिहास आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ने ,नेहरू,सुभाष याच्या नेतृत्वाखाली ( तेव्हा या दोघांचे पटत होते,चांगली मैत्री होती),२६ जाने १९३० ला पूर्ण स्वराज्य(नॉट डॉमेनियन), ची घोषणा केली.हा दिवस त्यानंतर संविधान दिवस म्हणून पाळण्यात येत होता. म्हणून २६ जाने हा दिवस गणतंत्र भारतासाठी निवडला गेला.

राजतंत्र ते गणतंत्र हा प्रवास एकूणच चित्त थरारक ऐतिहासिक महत्वाचा आहे. राजतंत्रात राजा हा सबकुछ असतो.देश जणू राजाची मालमत्ता असते.. गणतंत्र म्हणजे जनतेचे राज्य.निवडून आलेल्या प्रतिनिधींचे सरकार. इथे सगळे जनता ठरविणार.ग्राम पंचायत ते राज्य सरकार,केंद्र सरकार सारे लोकशाही पद्धतीने चालणारे शासन असणार.देश कुणा राजाची नव्हे तर जनतेची मालमत्ता असणार.या व्यवस्थेत विशेष अधिकारी वर्ग नसणार.एकाच घराण्याचे,वंशाचे प्रतिनिधी,राज्य नसणार. सरकारी पद,कार्यालये सर्वासाठी खुले,सर्वांना समान संधी असणार.कोणत्याही पदासाठी, कुणीही नागरिक निवडणुक लढवू शकतो. संप्रभुता जनतेच्या हाती असते.उदा द्यायचे झाले तर,सौदी अरेबिया,नॉर्थ कोरिया येथे राजतंत्र आहे, जॉर्डन,ओमान येथे राजतंत्र, लोकतंत्र यांचे मिश्रण आहे.ब्रिटन,भूतान,थायलंड,मलेशिया,जपान येथे संवैधानिक राज तंत्र आहे. म्हणजे तिथे राजा आहे जो निवडून येत नाही. घराणेशाही तून येतो.अमेरिका,भारत,पाकिस्तान ,बांगलादेश,लंका,ब्राझील,फ्रान्स, फिनलंड येथे लोकशाही, गणतंत्र आहे.

तात्विक स्तरावर आपण गणतंत्र आहे, लोकशाही आहे असे म्हणत असलो तरी खरी परिस्थिती काय आहे? ग्राउंड रियालिटी काय आहे हे तपासले तर काय चित्र दिसते? निवडून आलेल्या प्रतिनिधी,मंत्री,मुख्यमंत्री,प्रधानमंत्री यांची यादी बघितली तर घराणेशाही आहेच.एकाच घराण्यातील,एकाच वर्गातील माणसे निवडून येतात.अर्थात याला निवडून देणारे आपणही जबाबदार आहोतच.न्यायालय, डॉक्टर,वकील,व्यापारी,उद्योग,नगर प्रतिनिधी सगळीकडेच थोड्या फार प्रमाणात घराणेशाही आहेच. अगदी समाजात सुध्धा शाळा कॉलेजेस विशिष्ट घराण्यांनी काबीज केली आहेत.चित्रपट( बॉलीवूड) देखील अपवाद नाही(कपूर,खान घराणे).अजूनही समाजात जाती,धर्म,वर्ण यावर आधारित प्रचंड विषमता आहे.महिलांना पाहिजे त्या प्रमाणात,हव्या त्या क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने प्रतिनिधित्व नाही.योग्यता, कर्मठता,यावर आधारित प्रत्येकाला समान संधी मिळाली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने गणतंत्र अस्तित्वात आहे असे आपण म्हणू शकतो.थोडक्यात इतर देशांच्या तुलनेत आपली सर्वात मोठी लोकशाही अधिक प्रगल्भ,मजबूत आहे. पण संपूर्ण स्वराज्य, संपूर्ण गणतंत्र राबविण्या साठी खूप काही करणे बाकी आहे.



दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949


# व्यंगचित्रकार ते हिंदुहृदयसम्राट : बाळासाहेब ठाकरे

आधुनिक केसरी

**'माझे कुणाशी हाडवैर नाही, कारण माझ्या शरीरात हाडच आहेत वैर नाहीच' अशी मिश्कीलपणे,परखडपणे मत व्यक्त करणारे बाळासाहेब ठाकरे होते.सामाजिक जाण असणारे प्रबोधनकार व रमाबाई ठाकरे या दाम्पत्याच्या पोटी २३ जानेवारी १९२६ साली पुणे जिल्ह्यात जन्म झाला.प्रबोधनकार ठाकरे यांच्याकडून लहानपणीच बाळकडू मिळाले.बाळासाहेब ठाकरे यांच्या कारकिर्दीची सुरुवात खऱ्या अर्थाने 'व्यंगचित्रकार' म्हणून झाली.व्यंगातून सामाजिक,आर्थिक,राजकीय धोरणाची फटकार वृत्ती स्वजाणिवेतून लोकांसमोर मांडत होते.**

१९५० साली वयाच्या चोविसाव्या वर्षी 'फ्री प्रेस जर्नल' या कंपनीत व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले.वेगवेगळ्या संस्था,कंपन्या,जाहिरातीचे डिझाईन बाळासाहेबांकडून करवून घेत असत. आर.के.लक्ष्मण सोबत देखील बाळासाहेबांनी काम केले.यात इंदिरा गांधी यांची व्यतिरेखा अत्यंत लोकप्रिय झाली. बाळासाहेब सातत्याने बोलत असत की,'जीवनात एकदा निर्णय घेतला की परत मागे फिरू नका,कारण मागे फिरणारे इतिहास रचू शकत नाही.' याच विचाराने व्यंगचित्रकार म्हणून असलेली नोकरी सोडली आणि स्वतःचे साप्ताहिक काढण्याचा निर्णय घेतला. 'नोकरी मागणाऱ्यापेक्षा नोकरी देणारे व्हा' या उद्देशाने व्यंगात्मक 'मार्मिक' नावाचे साप्ताहिक काढले.संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रिय सहभाग घेणारे वडील प्रबोधनकार ठाकरे यांनी या व्यंगात्मक साप्ताहिकाचे नाव सुचविले.मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते १९६० ला प्रकाशन झाले. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला तरी मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाची वाचा मार्मिक साप्ताहिकाने मांडली.मराठी भाषेतील पहिले व्यंगचित्र साप्ताहिक म्हणून पुढे आले.बाळासाहेबांचा लहान मुलांशी असलेला लळा अधोरेखित करण्यासाठी 'श्याम' या नावाचे पाक्षिक देखील सुरू केले.व्यंग चित्रात असलेली ताकद,भेदकवृत्ती,वेचक निरीक्षणदृष्टीचा उत्कृष्ठ नमुना म्हणजे बाळासाहेबांची कलात्मक व्यंगात्म कृती होती. देशातील, महाराष्ट्रातील घडामोडीचे व्यंगात्म रुपात मांडण्याची सचोटी, वाभाडे काढण्याची हातोडी वाखाणण्याजोगी होती."महाराष्ट्रात समृद्ध वारसा लाभलेला आहे पण मराठी माणूस मागासलेला आहे,महाराष्ट्राला भारतात मान आहे पण मराठी माणूस महाराष्ट्रातच अपमानित होतो आहे.महाराष्ट्रात उद्योग आहे पण मराठी माणूस बेरोजगार आहे.महाराष्ट्रात सुविधा आहे पण मराठी माणूस दुविधेत आहे.महाराष्ट्र श्रीमंत आहे पण येथील मराठी माणूस गरीब आहे" यासारख्या अनेक समस्या असल्याने १९ जून १९६६ साली 'शिवसेना' या राजकीय पक्षाची स्थापना करण्यात आली.मराठी माणसांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना या राजकीय पक्षाची स्थापना केली.बाळासाहेब मराठी माणसांना उद्देशून बोलतांना म्हणत की,"तोंड वाजवून न्याय मिळत नसेल तर तोंडात वाजवून न्याय मिळावा,पण न्याय मिळालाच पाहिजे." असा अट्टाहास असायचा. शिवसेना पक्ष स्थापन झाल्यानंतर पहिल्यांदा मराठी माणसांना न्याय देण्यासाठी ३० ऑक्टोबर १९६६ ला शिवतीर्थावर पाच लाख लोकांच्या उपस्थितीत मेळावा आयोजित करण्यात आला. तेव्हापासून आजतागायत दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर मेळावे आयोजित केले जातात. व्यंगचित्रकार म्हणून ओळख असलेले बाळासाहेब वडील प्रबोधनकार व प्र. के.अत्रे यांच्या लेखणी प्रमाणे लेखणीला देखील धार होती त्यामुळे बाळासाहेब यांच्या जन्मदिनीच १९८९ साली 'सामना' वृत्तपत्र काढण्यात आले.

सामना या वर्तमानपत्रात अग्रलेख स्वतः बाळासाहेब लिहीत असत.पहिला अग्रलेख 'या असे सामन्याला' यातून सामना वर्तमानपत्र काढण्याची भूमिका व दिशा व्यक्त केली.शिवसेना या राजकीय पक्षाचे मुखपत्र सामना हे वर्तमानपत्र ठरले ते आजतागायत चालू आहे.त्याचे मुख्य संपादक म्हणून कार्यरत होते.बाळासाहेब ठाकरे यांचा कडवा हिंदुत्ववाद होता.'गर्व से कहो हम हिंदू है' हा नारा प्रचलित होता.बाँबस्फोट,देशविघातक कृत्य करणाऱ्या मुस्लिम समुदायाला देशात वा राज्यात राहण्याचा अधिकार नाही अशी रोखठोक विचार भाषणातून व्यक्त केले. राष्ट्रप्रेम,राष्ट्रभक्तीने राहणाऱ्या मुस्लिम समुदायाच्या बाजूने खंभीरपणे उभे राहणारे व्यक्ती होते.



ज्यावेळी भारतीय जनता पक्ष व शिवसेना युतीचे सरकार महाराष्ट्रात आले त्यावेळी बाँबे शहराचे मुंबई असे नामकरण,झुणका भाकर केंद्राची योजना,वृद्धाश्रमाची साखळी,वृध्दांना सवलती,झोपडपट्टी वासीयांना घरे,व्हॅलेंटाईन डे या पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध इत्यादी अनेक कार्य स्वतःकडे पक्षाची सूत्रे ठेऊन विधिमंडळात घडवून आणत होते.सर्वांना भाषणातून बोलत असत की,"वयाने म्हातारे झालात तरी चालेल पण विचाराने कधी म्हातारे होऊ नका." सध्याचे राजकारण बाळासाहेब यांच्या नावाभोवती फिरत आहे.जोपर्यंत हयात होते तोपर्यंत बिनदास्त,परखडपणे, बेधडकपणे वक्तव्य करीत राहिले आहेत त्यामुळे त्यांचा दरारा चोहीकडे घुमत असायला. हिंदू धर्माच्या लोकांसाठी व मराठी माणसाच्या गळ्यातील ताईत असलेले बाळासाहेब यांचे १७ नोव्हेंबर २०१२ रोजी हृदय विकाराने मातोश्री निवासस्थानी मुंबई येथे निधन झाले. त्यांना बिंदुमाधव,जयदेव,उद्धव ही तीन अपत्ये होती.त्यांची पत्नी मीना व मुलगा बिंदुमाधव १९९६ मध्ये त्यांच्या निधनापूर्वीच अपघातात निधन पावले.बाळासाहेबांच्या निधनानंतर २०१५ साली 'बाळकडू' व २०१९ साली ठाकरे नावाचा चित्रपट निघाला आहे. बाळासाहेब केशव ठाकरे यांची व्यंगचित्रकार ते हिंदु हृदयसम्राट ही बिरुदावली मिळवून आजही अजरामर आहेत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आपलेच दात आपलेच ओठ म्हणत कुठवर गप्प बसणार आहोत आपण ?

## संयमाचा परीघ



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226



चित्र : बाबूराव पाटील, भोकर

भाग : १२

आधुनिक केसरी

**कोण आहेत आपले आदर्श ? आदर्शाची व्याख्या काय आहे आपली ? तो... जो कायम आटकली काढत रहातो त्याच्याच पत्थ्यावर पडणा-या ? की तो जो कायम या बोटावरला थुका त्या बोटावर करतो ? त्याला म्हणायचं का आदर्श जो कधीच कुणाला शिवी शिवाय बोलला नाही की तो जो केवळ लाथा- बुक्यांनीच ओरडून आपले प्रश्न सोडवतो ? तो आहे का आपला आदर्श जो कायम फोनवर अधिका-यांची आय-माय उधळून आपली काम क्षणभरात चुटकी सरशी करुन देतो तुमची शासकीय कार्यालयातून ? तो आहे का जो केवळ समोर दिसला तरी कार्यालये चळचळा मुतून घेतात, घामाघूम होतात, त्याला हव्या त्या कागदांवर हव्या तेंव्हा हव्या तेवढ्या सह्या घेऊन जातो बकोटी धरुन अधिका-यांची, कायदा धाब्यावर बसवून. तेच का आपले आदर्श जे हातात केवळ दांडकं नाही तर गावढी पिस्तुल, नाही तर जंबिया बाळगुन असतात दहा-पाच जन त्याच्या मागं पुढं डाबरमॅन सारखे सोबत ? की तो जो येता जाता कुणाच्याही दुकानातलं कांहीही उचलून खातो आणि सरळ उठून जातो एक छदामही न देता तो ? ते आहेत का ओपन जीपमधे दहापाच आडदांड धिप्पाड धेंडं घेऊन फिरंत असतात साखळ्यांसारखे ब्रासलेट बांधलेले...आणि गळ्यात पालीसं मारलेल्या कुत-यांसारख्या साखळ्या घालून दहशत माजवणारे ?ते जे सन्माननीय पोलिसांनाही भीत नाहीत...ते आहेत का खुंखार माजोरी आपले आदर्श ? की ते जे केवळ टेंडर भरुन कागदं काळे करुन इंजिनिअरच्या सह्या त्याच्या नरडीवर पाय देवून घेवून अवघेच्या अवघे बिलं उचलून गाड्या घेऊन, बंगले बांधून ऐश करतात ? की ते जे नरडीवर पाय देवून मतदानं घेऊन पाच वर्षे केवळ सत्तेचा वापर सरकारी यौजना, सरकारी जागा आणि सरकारी सुविधांचा उपभोग घेण्यातच मशगूल असतात ? कोण आहेत कोण तुमच्या आमच्या पिढ्यांचे आदर्श आज ?**

आपण पोरांना अडवू शकत नाहीत आता ऐऱ्या गैऱ्या वाटेवर जाण्यापासून ? कुठलाच कासरा आपण आपल्या ताब्यात कधी ठेवला नाही. त्याच्या डोळ्यादेकत त्यांचाच टुकार वर्गमित्र फलान्या पक्षाचा युवा नेता म्हणून.तो जाहीर आपल्या दादागिरीच्या जोरावर गावंच्या गावं आपल्या दहशतीखाली घेऊ शकतो. त्याचा पेहराव त्याच्या गाड्या, त्याचा खर्च आणि उधळामादळ वर्गात सिरियसली आभ्यास करत बसलेला बघतो आणि त्याला शिकवलेल्या नितीमूल्यांवरील विश्वास उडून जातो.नैतीक मार्गानं चार घासं खावून जगता येईल या तत्थ्यापर्यंत ते आले आहेत. गाडी, बंगला, मौज, मजा, पर्यटन, फॅशन करता येत नाही बापाच्या तुटपुंज्या पगारात हे लक्षात येतं लेकरांच्या आणि अनेकदा नाविलाजास्तव आणि "छोडो यार ये पढाई -वढाई, मजे उठावो, चलो लाँग ड्राईवपर चलते है !" ही अतीरेकी आनंदाचं आवतनं त्याला त्याची सज्जन मार्गी जगण्याची वाट बदलायला भाग पाडते. शासकीय सेवेत जाणा-या हल्लीच्या कर्मचा-यांना नौकरी नंतर पेन्शन नाही. विस विस पंचेवीस वर्षांनी कन्हह कुथत सुरु असलेल्या शाळांना अनुदान नाही. पैसा घालायलंय कुठं सरकार ? विद्यार्थ्यांना दर महा स्कॉलर्शीप नाही. कशासाठी आहे ही यौजना ? आता इथुन पुढं फक्त कायमस्वरुपी विनाअनुदान असेल म्हणतंय...याचा अर्थ ? 'तुम्ही शिकु वाटलं शिका नाही तर मसनात जा !', 'ज्यांची ऐपत आसंल तेच शिकतील.' हीच का ती...'जे बलवान असतील, टिकून राहतील !' अर्थात... 'सर्वायवल ऑफ द फिटेस्ट पॉलिसी' ? हे आहेत का तुमच्या पिढीचे आदर्श ?

एवढा मोठा अर्थसंकल्प सादर केला जातो दरवर्षी... "पैसा येतो कुठून आणि जातो कुठं ?" सांगीतलं जातं. त्यात येतं का हे सगळं की अजून कांही असतं आगळं-वेगळं ! खर्चाचे कारणं कधी बघितले का आपण ? पैसा जाण्याच्या वाटा पाहिल्यात का कधी ? किती जमीनी वाटल्या सरकारनं करोडो अब्जावधीच्या आणि कुणाला ? कुणाला दिलीत बॅंका उघडून भांडवलं, उद्योगं उभे करायला आणि कोणत्या यौजनांनी पळवली अर्थ मंत्रालयाची थैली ? निधी उपलब्ध कुठल्या कारणांसाठी तत्परतेनं केला जातो शासनाचा ? कोणत्या आपत्तींसाठी केली जाते तरतूद दिल खोलके ? कोण करतो या रकमांचा वापर ? तुम्ही कुठल्याही पक्षाचे असा... समाजाचं नेतृत्व करु पाहणा-या तरुणांना हे माहीत असायला हवं ? मार्च यंडला गावोगावचे प्रस्तावीत निधी परत जातात जिल्हा कचेरीतून शासनाच्या तिजोरीत ? या परत जाणा-या रकमांचे कुठले हेड्स आहेत आणि निधी का वापरला जात नाही ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदांकडून, आमदार-खासदारांकडून, जिल्हा परिषद पंचायत समीती सदस्यांकडून, सरपंचांकडून ? जाचक अटी असतात का फार ज्यांची पुर्तता करता येवू शकत नाही की अजून काही वेगळंच कारण असतं अशासाठी ? हा शोध का घेत नाही नेतृत्व ? आपण कुणाचे फॉलोअर्स आहोत ? आपण आणि आपले लोकप्रतिनीधी यांचा संवाद व्हायला हवा 'जनताकी अदालत' वगेरे सारख्या कार्यक्रमांमधून.थेट प्रश्न विचारता यायला पाहिजेत अधीकारी आणि लोक प्रतिनिधींना.शिक्षणावरती किती रक्कम प्रस्तावित होती आणि किती खर्च केली ?शेतीवरती किती रक्कम प्रस्तावित होती आणि किती खर्च केली ?आरोग्यावरती किती आणि संरक्षणावरती किती ?संशोधनाला कांही स्कोप ठेवला आहे का ? तळागाळाला विकसीत करण्याला आहे का कांही रक्कम ? रस्ते-पाणी-वीज यांचा आराखडा आहे का कांही नियोजनीचा खर्चाचा ? दूरसंचारवर काय आहे खर्च आणि आदिवासी विकासाचं आहे का कांही डोक्यात ? का निवडून देत चाललो आहोत आपण तेच तेच संवेदनाहीन लोकं ज्यांनी स्वतःच्या विकासा पलिकडं पाहिलं नाही. सालोन् साल आपण तेच तेच पाढे का गिरवत आलोत? आपल्याला डोकंबिकं आहे की नाही ? तो चालाख असतो. आपल्या माणसांसोबत असला की आपला, आपल्या जातीचा विषय काढतो. आपला माणुस कुणी का असंना कुठल्या का पक्षात तो पुढं गेला पाहिजे म्हणतो. तो आपल्या माणसांपासून जरा बाहेर गेला की 'हे जातीचे बारकुले बिळं खुट्या मारुन बंद करायला हवे म्हणतो'.याचं हे दोनतोंडी असणं कसं समजून घ्यायचं ? तो जाहीर भाषणात आपल्याला जरा व्यापक व्हा म्हणतो, आपण महापुरुषांचे पाईक आहोत, त्यांच्या विचारांचे लाभार्थी आहोत. आपली कांही जबाबदारी आहे की नाही विचारतो ? तो जगासमोर दीन-दलीतांच्या सगळ्या नेत्यांना शिव्या देतो आणि "काशी करा एका जागी या" म्हणतो, "त्या शिवाय आपलं हीत होणार नाही" इथवर सांगतो.

मला कळंत नाही... **यानं आपली चूल कधी इजू दिली नाही, त्यानं आपली भाकर कधी करपू दिली नाही, त्यानं आपली धुळधान कधी उडू दिली नाही, ती कशी ? कुठून ? कुठले उंबरे झिजवून ? या बद्दल तो जगजाहिर बोलत नाही... याला म्हणायचा का आपला आदर्श ?** तो भारी आहे, सामाजिक चळवळी चालवतो. दर वेळी हमखास कर्मचा-यांनी कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभं रहायला पाहिजे म्हणून तात्कालिक छोट्या मोठ्या वर्गण्या गोळा करुन छाटछुट कार्यक्रमं लावून त्याच त्या आणि अर्थात सगळ्याच पक्षाच्या पुढा-यांना मंचावर बसवतो, आगळ-पगळ हसतो. त्यांच्याच गळ्यात हार घालतो छान मकरी हसतो. ज्यांचा उद्धार त्याने आपल्या समाजासमोर व्हिलन म्हणून केलेला असतो हा नेमका त्यांच्याच भकीला ओशाळवाना हसंत बसलेला दिसतो.या धुर्त खेळ्यांनी माणसात माणसं ठेवली नाहीत.

सांगा ! कोणाला फॉलो करायचं आपण ? कुणाच्या मागं डोळे झाकून चालायचं ? कोण कधी गरदाडात घालील आपल्याला याची आहे शास्वती ? आपण सगळेच मेंढरं जरा भावनीक अपील कोणी केलं की धाड धाड उड्या मारतो.आपण जगतो आहोत की मरतो आहोत, हे ही सांगायला वर येवू शकत नाहीत, यावरही कधी विचार केला नाही आपण. आपण जर असेच दलींदर जगंत गेलो इथून पुढेही तर मग अवघड आहे. आमच्या पिढीने बाबासाहेबांची विद्वत्ता आदरणीय माणून अनुकरण केलं.महात्मा फुलेंचं समाजभान स्विकारलं. रयतेचा राजा असावा तर राजे शिवरायांसारखा, राजर्षी शाहू महाराजांसारखा म्हणालोत.अण्णाभाऊंची मानवता मौलीक मानली.रमाईचा त्याग पूजनीय मानला आणि सावित्रीमाईंच्या थोर कर्तुत्वाला अनुकरणीय मानलं.आई असावी तर जिजाऊंसारखी हे आम्ही ओरडून सांगीतलं सा-या जगाला. आम्ही अपार आदर बाळगला संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकोबांच्या जीवनकार्याबद्दल.आम्ही संत गाडगेबाबांना, संत तुकडोजींना कृतीतून फॉलो करत आलोत.समाज सेवेसाठी त्यागी समर्पीत आयुष्य जगलेले बाबा आमटे असोत नाही तर त्यागी समर्पीत मदर टेरेसाला आम्ही आदर्श मानले.गौतम बुद्धाची करुणा आम्ही अतःकरणावर कोरून घेतली. काळ फार झपाट्याने बदलत चालला आहे. आता नाही सांगता येत छातीठोकपणे कुणालाच तुम्ही की तुम्ही या वाटेवर चाला अथवा तुम्ही फलानी विचारधारा जगून बघा.सिनेमा आणि त्याहून जास्त राजकारण आणि इझी मनी पॉलीसीने तरुणाई क्याप्चर केली आहे.तुमचे लेकरं तुमचं कांही ऐकतीलच असं नाही आणि तुम्ही सांगण्याच्या पात्रतेचेही रहाल की नाही याची नाही देता येत शास्वती.आपलेच दात आणि आपलेच ओठ म्हणंत कुठवर गप्प बसणार आहोत आपण ?

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी भाषेचे संशोधन मार्गदर्शक आहेत.)**

# डॉ. होमी जहांगीर भाभा




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते.**

डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले.

वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले.




१९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली.

१९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले.



# भूतकाळ

आधुनिक केसरी



जयेश अर्जुन माधव
संपर्क 9167710614

हा भूत बनून नेहमीच आपल्या मानगूटीवर बसत असतो. त्यामुळे भूतकाळाचा विचार आत्ताच थांबवा. भूतकाळात काय घडले याची चिरफाड करत बसलो तर पुढे घडणाऱ्या गोष्टी निराशाजनक असतील. मित्रांनो आयुष्य नेहमी पुढे सरकत असतं ते कोणासाठीही थांबत नसतं. घडणारं तर घडून गेलं... नंतर विचार करत बसण्यात काय अर्थ ..? स्वतःवर विश्वास ठेवा. स्वतःचा आत्मसन्मान करा. स्वतः मधला नम्रपणा जपा आणि कधीही माघार घेऊ नका. तुम्ही खुप चांगले आयुष्य जगू शकता.तुम्ही जे दुसऱ्यांना देऊ शकता ते द्या. त्यामुळे तुमच्याकडचे कमी न होता उलट वाढेलच. स्वतः बरोबरच दुसऱ्यांचाही विचार करा. एकटेच पुढे जाण्यापेक्षा इतरांना सोबत घेऊन चला. एकटं चालणं आणि सोबत चालणं यात खुप फरक असतो. घडून गेलेल्या गोष्टींकडे पुन्हा पुन्हा मागे वळून बघु नका. सुख शांती समाधान पुढे आहे, मागे फक्त आठवणी.

# नेताजी-क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान



भारत बल्हाळ
संपर्क क्र. 7588819471

आधुनिक केसरी

**भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या हजारो क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान! भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिपर्वाचे तेज:पुंज सूर्यबिंब! नेताजी सुभाषचंद्र बोस! ज्यांच्या केवळ नामोच्चाराने अंगावर रोमांच उभे राहावेत, बाहू स्फुरण पावावेत, देशासाठी जीवन सर्वस्व अर्पण करण्याची प्रेरणा व्हावी, ते नेताजी! नेताजींचे संपूर्ण जीवनच धगधगते यज्ञकुंड होते. देशभक्तांची एक प्रचंड मोठी फळी नेताजींनी उभारली.**

मातृभूमीला गुलामगिरीतून मुक्त करण्याचे वेड लागलेले देशभक्त-शेवटच्या श्वासापर्यंत भारतमातेला प्रणिपात करणारे आणि पुन्हा तिच्याच उदरात जन्म घेण्याची इच्छा व्यक्त करणारे देशभक्त!

सुभाषचंद्र बोस हे भारतीय इतिहासातील असे युगपुरुष आहेत ज्यांनी स्वातंत्र्यलढ्याला नवे वळण दिले.

भारताला स्वतंत्र करण्यात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. त्यांनी आझाद हिंद फौज स्थापन करून इंग्रजांना धक्का दिला. सुभाषचंद्र बोस हे तरुणांसाठी प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांच्या जीवनाचा संघर्षमय प्रवास आणि देश स्वतंत्र करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न ही अजरामर गाथा म्हणून ओळखली जाते. सुभाषचंद्र बोस हे भारताचे महान स्वातंत्र्यसैनिक होते, त्यांनी देशाला ब्रिटिशांपासून मुक्त करण्यासाठी खूप प्रयत्न केले. ओरिसाच्या बंगाली कुटुंबात जन्मलेले सुभाषचंद्र बोस हे एका संपन्न कुटुंबातील होते, परंतु त्यांचे आपल्या देशावर खूप प्रेम होते आणि त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य देशाच्या नावासाठी समर्पित केले होते.

सुभाषचंद्र बोस यांनी मातृभूमीला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी ज्यांनी आपले रक्त सांडले, जे शहीद झाले, हुतात्मा झाले, जे हसतमुखाने फासावर गेले, त्यांचे कायम स्मरण होत राहते. देशवासीयांच्या मनात त्यांच्याविषयी असणारी भक्तीची भावना आणि आदरयुक्त कृतज्ञता हीच त्यांची स्मृती असते, तेच त्यांचे कायम स्मारक असते. भारतमातेच्या अशाच एका महान पुत्राचे, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील महानायकाचे असेच चिरकालीन स्मारक प्रत्येक भारतवासीयाच्या मनात उभे आहे. ते महानायक म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस!

### सुभाष चंद्र बोस यांचे बालपण आणि शिक्षण

ओरिसा प्रांतातील कटक या शहरात सुप्रसिद्ध बोस कुटुंबात 23 जानेवारी, 1897 रोजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म झाला. सुसंस्काराचे माहेरघर असणाऱ्या प्रभावतीदेवी आणि ख्यातनाम वकील जानकीनाथ बोस हे त्यांचे आई-वडील. सुभाषचंद्राचे प्राथमिक शिक्षण कटकमधील बॅप्टिस्ट मिशनने चालविलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत झाले. हायस्कूलच्या शिक्षणासाठी 1909 मध्ये सुभाषला रेव्हेनशाँ कॉलेजिएट स्कूलमध्ये प्रवेश देण्यात आला. त्या शाळेचे मुख्याध्यापक वेणी माधवदास यांच्या व्यक्तिमत्त्वाचा बराचसा प्रभाव सुभाषच्या बालमनावर पडला. आपल्या मुलाने उच्चशिक्षित होऊन ब्रिटिशांच्या शासनात अधिकारी व्हावे असे वडिलांना वाटत असे; पण सुभाष मात्र हायस्कूलमध्ये शिकत असतानाच 'अनुशीलन समिती'सारख्या क्रांतिकारी संघटनेशी जोडला जात होता. खुदीराम बोसला फाशी दिल्याची बातमी वाचून त्याला रडू कोसळलं होतं. रासबिहारी बोस यांच्या मदतनिधीला त्याने सढळ हाताने मदत केली होती.

शालेय शिक्षण घेत असतानाच त्याला अवांतर वाचनाची प्रचंड आवड निर्माण झाली होती. विशेषतः विवेकानंदांचे सर्वच्या सर्व ग्रंथे त्याने वाचून काढले. विवेकानंदाजवळ असणारा दीनदुबळ्यांचा कणव सुभाषने स्वतःच्या जीवनात उतरवला होता. कटकजवळच्या एका खेड्यात पटकीची साथ आली तेव्हा दहावीच्या वर्गात शिकणारा सोळा वर्षांचा सुभाष त्या खेड्यातील गोरगरिबांच्या शुश्रूषेसाठी धावून गेला. सुभाषचे अवांतर वाचन, समाजसेवेची आवड पाहून घरच्या मंडळींना सुभाषच्या अभ्यासाची चिंता वाटायला लागली. वडिलांना तर तो दहावीची परीक्षा उत्तीर्ण करेल किंवा नाही याची काळजी लागली होती; पण सुभाष दहावीच्या परीक्षेत संपूर्ण बंगाल प्रांतात गुणानुक्रमे दुसरा आला. वयाच्या सोळाव्या वर्षी 1913 साली सुभाषने हे प्रचंड यश संपादन केले. अचाट बुद्धिमत्ता, विलक्षण स्मरणशक्ती आणि उत्कृष्ट योजकता हे सुभाषचे विशेष गुण आणि अद्‌भुताची ओढ हा छंद!

उच्चशिक्षणासाठी सुभाष यांनी कोलकात्याच्या प्रेसिडेन्सी महाविद्यालयात प्रवेश घेतला. तत्त्वज्ञान हा त्यांच्या विशेष आवडीचा विषय. सुभाष यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व, तीक्ष्ण बुद्धिमत्ता, अभ्यासपूर्ण विवेचनशैली, भारदस्त आवाज यामुळे कॉलेजमध्ये त्यांना अनेक मित्र लाभले आणि त्या सर्वांचे नेतृत्वही त्यांच्याकडेच आले. विवेकानंदांचे विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवणे चालू होते. योगसाधना, ध्यानधारणा, मानवता, अध्यात्म, ईश्वरप्राप्ती, सद्‌गुरु शोध या सर्व गोष्टींचा सतत ध्यास त्यांच्या मनाला लागला. पुढे 'विवेकानंद मेळा' स्थापन करण्यात आला. या मेळ्याचे सर्व सदस्य सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली गुरुच्या शोधात हिमालयाकडे निघाले. दुर्दम्य इच्छाशक्ती, अमर्याद आकांक्षा, अद्‌भुताची, ईश्वरशक्तीच्या साक्षात्काराची ओढ यामुळे भटकंतीला मर्यादा उरली नाही. दिल्ली, आग्रा, मथुरा, वृंदावन, हरिद्वार, गया, काशी, हृषिकेश आणि हिमालयाच्या कडेकपारी भटकंती सुरू झाली. अनेक साधुसंतांच्या भेटी घेतल्या. भारतीय समाजातील दांभिकता, उच्चनीचता, स्पृश्य-अस्पृश्यता हे सगळे पाहून सुभाषचे मन विषण्ण झाले. शेवटी एका साधूने सांगितले, "परमेश्वर, असा डोंगराच्या कडेकपारी नसतो. तो तिथे असतो जिथे श्रमिक कष्ट करतात. स्वतःमध्ये वसत असलेल्या दिव्यत्वाचा शोध घ्या."

स्वामी विवेकानंदांचेच विचार तो साधू बोलून दाखवीत होता. त्याच साधूने सुभाष आणि त्यांच्या मित्रांना कोलकात्याला परत पाठविले.



पूर्ववत अभ्यास सुरु झाला. दरम्यान, कॉलेजमध्ये एक घटना घडली. प्रा. ओटन यांनी काही विद्यार्थ्यांना छड्या मारल्या. संपूर्ण विद्यार्थी वर्तुळात तो विषय चर्चिला गेला. सर्व विद्यार्थ्यांनी प्रा. ओटन यांना घेराव घातला. धक्काबुक्की केली. सुभाष त्यांच्यासोबत नव्हता; पण तो वर्गप्रतिनिधी होता. त्यामुळे प्राचार्यांनी त्यालाच बडतर्फ केले. त्यानंतर त्यांचे एक वर्ष वाया गेले; पण सुभाषने स्वाभिमान कधीच सोडला नाही.

### आय.सी.एस. चा राजीनामा

आशुतोष मुखर्जी यांच्या शिफारसपत्रावरून दुसऱ्या वर्षी सुभाषला कोलकात्याच्या स्कॉटिश चर्च कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. तत्त्वज्ञान हा विषय घेऊन सुभाषने 1919 मध्ये पदवी परीक्षा प्रथमश्रेणीत उत्तीर्ण केली आणि एम.ए.चा अभ्यासही सुरु केला; पण त्यांच्या वडिलांना सारखे वाटे सुभाषने आय.सी.एस.ची परीक्षा उत्तीर्ण करावी. केवळ वडिलांच्या इच्छेचा मान राखण्यासाठी सुभाष इंग्लंडला गेला. केवळ आठ महिन्यांच्या अभ्यासावर सुभाष आय.सी.एस.ची परीक्षा उत्तीर्ण झाला, एवढेच नव्हे तर त्या तो परीक्षेत गुणानुक्रमे चौथा आला. ब्रिटिश शासनात सनदी अधिकाऱ्याचे सर्वोच्च पद प्राप्त करून देणारी ती परीक्षा होती. ब्रिटिशांच्या सेवेत प्रवेश करून एखाद्या सरंजामदारासारखे शाही जीवन जगणारे आय.सी.एस. अधिकारी अवतीभोवती होते; पण केवळ वडिलांच्या इच्छेखातर सुभाषने ही परीक्षा दिली होती. सरकारी नोकरी तो कुठल्याही परिस्थितीत स्वीकारणार नव्हता. आजन्म अविवाहित राहून देशवासीयांची सेवा करायची, मातृभूमीला स्वातंत्र्य मिळवून द्यायचे, जातिभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, गरिबी, अनारोग्य या 'पंचासुरा'पासून देशाला मुक्त करायचे आणि ब्रिटिशांचे जालीम शासन देशातून हद्दपार करायचे, हा निश्चय सुभाषचंद्रांनी केव्हाच केला होता. इंग्लंडमधील वास्तव्यातच आय.सी.एस.चा राजीनामा देऊन सुभाषचंद्र बोस भारतात परतले. संपूर्ण सुखाचा, संपत्तीचा त्याग करून सुभाषचंद्रांनी हे सतीचे वाण बुद्धिपुरस्सर स्वीकारले आणि आयुष्याच्या अस्तापर्यंत ते जपले, किंबहुना स्वतःच्या संपूर्ण आयुष्याचाच होम केला.

**ब्रिटिशांविरुद्ध आंदोलनाला सुरुवात :** आय.सी.एस.चा त्याग करून भारतात परत आल्यानंतर त्यांनी महाकवी टागोरांच्या सूचनेनुसार मुंबईत गांधीजींची भेट घेतली. भारतीय राजकारणावर मोकळ्या मनाने त्यांच्याशी चर्चा केली. केवळ देशसेवेसाठी आय.सी.एस.चा त्याग करणारा हा तेजस्वी युवक पाहून गांधीजी प्रभावित झाले. तिथेच विठ्ठलभाई पटेल यांचा आणि सुभाषचा परिचय झाला. गांधीजींनी सुभाषला कोलकाता येथे जाऊन देशबंधू चित्तरंजनदास यांच्यासोबत कार्य करण्याचा सल्ला दिला. देशबंधू चित्तरंजनदास यांनी स्वतःची हजारो रुपये कमाई करून देणारी वकिली सोडून देऊन स्वतःला असहकार आंदोलन आणि स्वदेशी शिक्षणाचा प्रसार या कार्यांना वाहून घेतले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली सुभाषने असहकार आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवला.

स्वदेशी शिक्षणाच्या प्रचारासाठी कोलकाता येथे नॅशनल कॉलेजची स्थापना केली. त्या कॉलेजमधील युवकांना देशभक्तीची शिकवण देण्यासाठी सुभाषचंद्र बोस हे योग्य आहेत याची खात्री पटल्यामुळे नॅशनल कॉलेजचे प्राचार्यपद सुभाषचंद्रांना बहाल करण्यात आले. प्राचार्यपदावरून सुभाषचंद्रांनी त्या कॉलेजमध्ये शैक्षणिक सुधारणा तर केल्याच त्याचबरोबर तेथील युवकांच्या मनावर देशभक्तीचे संस्कारही केले. देशासाठी सर्वस्वाचा त्याग करणारा एक खूप मोठा संघटित चमूच त्यांनी तयार केला. 1922 साली 'प्रिन्स ऑफ वेल्स' भारतभेटीवर येणार होते. जालियनवाला बागेतील हत्याकांड भारतीय जनता विसरलेली नव्हती. प्रिन्स ऑफ वेल्सच्या आगमनावर बहिष्कार टाकण्याची योजना गांधीजींनी जाहीर केली. युवराजाच्या कोलकात्यातील आगमनाचा निषेध नोंदविण्यासाठी सुभाषचंद्र बोस यांनी खूप मोठे स्वयंसेवक दल निर्माण केले. आय.सी.एस.चा राजीनामा दिल्यामुळे ब्रिटिश शासनाला सुभाषचंद्रांविषयी अगोदरच राग होता. त्यांनी सुभाषचंद्रांना लगेच अटक केली. चित्तरंजन दास आणि सुभाषचंद्र बोस दोघांनाही प्रत्येकी सहा महिन्यांच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. सुभाष कारावासातून सुटले तेव्हा बंगाल प्रांतात नद्यांच्या महापुराने जनता हवालदिल झालेली होती.

सुभाषचंद्रांनी डॉ. प्रफुल्लचंद्र रे यांच्यासोबत पूरग्रस्तांची सेवा केली. निर्वासितांना सर्वतोपरी मदत केली. त्याच्याच पुढच्या वर्षी चित्तरंजनदास यांनी 'स्वराज्य पक्षा'ची स्थापना केली. पक्षाच्या प्रचारासाठी 'फॉरवर्ड' नावाचे मुखपत्र सुरू केले आणि त्याच्या संपादकपदाची जबाबदारी सुभाषचंद्र बोस यांच्यावर सोपवली. बंगाल प्रांतातील निवडणुकांमध्ये स्वराज्य पक्षाने प्रचंड यश मिळविले. चित्तरंजनदास कोलकाता शहराचे महापौर म्हणून निवडून आले. सुभाषचंद्र बोस यांना कोलकाता महानगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्याचे पद देण्यात आले. सुभाषचंद्र यांनी तेथील पूर्ण प्रशासन भारतमय करून टाकले. सर्वांना खादीचा पोशाख देण्यात आला. शिक्षण विनामूल्य करण्यात आले. ब्रिटिश अधिकाऱ्यांचे सत्कार करण्याची पद्धत बंद करण्यात आली. देशासाठी त्याग व समाजसेवा करणाऱ्यांचे सत्कार व्हायला लागले. हे सर्व पाहून ब्रिटिश अधिकारी अधिकच क्रोधीत झाले. त्यातच नोकरी भरतीसाठी सुभाषचंद्रांनी दिलेल्या जाहिरातीमुळे आगीत तेल ओतल्यासारखे झाले. सुभाषबाबूंनी मुख्याधिकारी म्हणून दिलेली जाहिरात अशी होती, "ज्या देशबांधवांनी स्वदेशासाठी यातना सहन केल्या असतील, त्यांनी नोकरीसाठी कोलकाता महापालिकेकडे अर्ज करावेत." सुभाषबाबूंनी ज्यांना नोकऱ्या दिल्या त्यांची चौकशी झाली. गोपीनाथ सहाय या क्रांतिकारकाविषयी आदरभाव व्यक्त करणारा ठराव बंगाल प्रांतिक परिषदेत पास करण्यात आला. **क्रमश :**




# साप हा शेतकऱ्यांचा मित्र

आधुनिक केसरी

**सापाची हाडे :** साप सरपटणारा प्राणी असून त्याच्या शरीरात १३० ते ५०० हाडं असतात. सापाच्या प्रजातीवरून त्यांच्या शरीरातील हाडांची संख्या ठरते. म्हणजेच वाळा या लहान सापांना कमी हाडं असतात तर अजगरासारख्या अजस्त्र सापाला जास्त हाडं असतात. पण सापाच्या लवचीकतेमुळे सापाच्या शरीरात हाडं नसावेत असे आपल्याला वाटते. सापळ्यातील प्रत्येक बरगडीला मासपेशी जोडलेली असते. हाड व मासपेश्या एकमेकांना लवचीकतेने व मजबुतीने जोडले गेले असल्यामुळे सापाचे शरीर इतके लवचीक असते. सापाचा जबडा माणसाच्या जबड्याप्रमाणे एकमेकांना जोडलेला नसतो. यामुळेच साप आपल्या तोंडाच्या आकारापेक्षा मोठे भक्ष खाऊ शकतो. सापाचा जबडा १५० डिग्री पर्यंत उघडू शकतो. उष्मासंवेदनग्राहक खाचा काही सापांना डोळे व नाकपुड्या यांच्या मध्ये दोन खाचा असतात.या खाचांना इंग्रजी मध्ये हिट सेन्सिंग पिट्स किंवा थर्मल पिट्स म्हणतात. या खाचा नाकपुड्या पेक्षा मोठ्या असतात. या खाचा सापा समोरील प्राण्यांच्या शरीरातील उष्णता ग्रहण करतात आणि यामुळेच साप अंधारातही भक्ष अचूकपणे पकडू शकतो. सभोवतालच्या तापमानातील अतिसूक्ष्म बदलही या सापांना सहज जाणवतो. या सापांना ०.०००३ डिग्री सेल्सियस इतका सूक्ष्म बदलही लक्षात येतो. शास्त्रज्ञाना काही सापांना ०.०००१ डिग्री सेल्सियस इतका फरक लक्षात आला असल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्रात सापडणारे चापडा व अजगर या सापांना उष्मासंवेदनग्राहक खाचा आहेत.



सागर सोनवणे
संपर्क 7757847104

**कात व खवले :** -साप कात टाकतो म्हणजे अमर होतो असा एक गैरसमज आजही ऐकावयास मिळतो. पण कात टाकणे हि एक नैसर्गिक क्रिया आहे. माणूसही कात टाकत असतो पण माणसाच्या शरीरावर धर्मग्रंथी असल्याने शरीरातील टाकाऊ पदार्थ घामा वाटे बाहेर टाकले जातात. डोक्यातील कोंडा (DANDRUFF), केस आणि नखं हे कातीचेच प्रकार आहेत. पण सापाच्या शरीरावर घर्मग्रंथी नसल्याने त्याची कात एकसंध नाकाच्या टोका पासून शेपटी- च्या टोका पर्यंत निघते. कात म्हणजे सापाच्या शरीरावरील मृत पेशींचा थर असतो. आकाराने व वयाने लहान असणारा साप लवकर कात टाकतो. **कात काढण्याची प्रक्रिया :** या कालावधीत साप खूप चिडचिडा होतो. सापाचे डोळेही कातीने झाकल्यामुळे त्याला अस्पष्ट दिसू लागते. हा काळ 8 ते 12 दिवसांचा असतो. सापाचे शरीर आणि कात या दोन्ही मध्ये निर्माण झालेल्या लीम्फेटिक स्त्रावामुळे सापाचा रंग अस्पष्ट दिसू लागतो. कात काढतेवेळी साप त्याचे डोके खडबडीत जागेवर घासतो आणि आधी तोंडावरील कात काढतो आणि नंतर शेपटी पर्यंत पूर्ण कात काढतो. काही वेळेस सापाची कात पूर्ण निघत नाही आणि अर्धवट राहीलेली कात केस आहेत असे वाटते. पण सापाच्या शरीरावर केस येऊ शकत नाहीत कारण केस येण्यासाठी घर्मग्रंथीची गरज असते जी सापामध्ये नसते. जन्मलेले साप दोन ते तीन दिवसात कात टाकतात. खवले हे सापाच्या शरीराचे कवच असतात. खवले अनेक प्रकारे सापाच्या त्वचेचे रक्षण करतात. सरपटताना होणाऱ्या घर्षणापासून खवल्यामुळे त्वचेचे रक्षण होते. अतिनील (ULTRAVIOLET) व अविरक्त (INFRARED) किरणांपासून त्वचेचे रक्षण होते. साप जेथे राहतो त्यावरून त्याच्या खवल्याचा प्रकार ठरतो. गुळगुळीत खवले (SMOOTH SCALES ): - जमिनीखाली राहणाऱ्या सापांचे खवले गुळगुळीत असतात. या प्रकारच्या खवल्यांमुळे सापांना बिळातून मुक्त संचार करणे सोपे होते. उदा:- मांडूळ, नाग, धामण, मृदुकाय सर्प.

**सापाचे विष व सापाचे प्रजनन :** सापाचे विष म्हणजे एक प्रकारची लाळ असते जी सापाला अन्न पचवायला पाचक रस म्हणून काम करते. सापाच्या विषामध्ये प्रथिने व एन्झाइम असे अनेक घटक असतात. हे विष एका ग्रंथी मध्ये साठवलं जातं ज्याला विषग्रंथी म्हणतात. हे विष रक्तात मिसळल्यावरच घातक ठरते. महाराष्ट्रात विषारी सापाच्या विषाचे २ प्रमुख प्रकार आहेत.

1) न्यूरोटॉक्सिकः- हे विष मज्जा संस्थेवर म्हणजेच मेंदू वर परिणाम करते. उदा :- नाग, मण्यार, पोवळा, नागराज. **क्रमश :**

# मृत्यू कोणाला चुकला ? जगून तर पहा !

आधुनिक केसरी

संपूर्ण भूतलावर जो जन्मतो त्याचा मृत्यू हा अटळच आहे. कलियुगात अमृत हा शब्द काल्पनिकच ठरला आहे. जो या पृथ्वीवर जन्मास आला आहे त्याचा अंत हा झालाच आहे , असा इतिहास आहे आणि भविष्यही हेच आहे. कारण पृथ्वीचा उदय (५.५४ अब्ज वर्षे) जेव्हा झाला तेव्हापासून आजपर्यंत तरी कोणी जिवंत आहे असा अपवादही आज तागायत नाही. जगात अस्तित्वात असलेली सर्वच धर्म हेच सांगतात की मृत्यू अटळ आहे जो जन्म घेतो त्याचा अंत हा ठरलेलाच असतो. अगदी धनाने ,मनाने ,भक्तीने , शक्तीने आणि संपत्तीने जगात सर्वश्रेष्ठ असलेला आज पर्यंत तरी कोणीच अमर झाला आहे असे झाले नाही. नव्हे तो आज तरी जिवंत आहे असे कोणी सांगत नाही.



दिनकर जाधव
संपर्क ७०८३२७२७७७

जीवन हे जगण्यासाठीच आहे ते कशा पद्धतीने जगायचे हे मात्र प्रत्येकाच्या आपापल्या कर्मावर अवलंबून असते. त्यामुळे आपल्या जीवनामध्ये काही गोष्टी असफल झाल्या किंवा काही गोष्टी मिळाल्याच नाहीत म्हणून आपण जीवनाचाच अंत करणे हे मात्र निव्वळ अशोभनीय आहे. नाही तरी समाधान म्हणजे काय असते याबाबत जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज यांनी आपल्या एका अभंगातील ओळीमध्ये " ठेविले आनंते तैसेचि राहावे चित्ती असु द्यावे समाधान " असा उल्लेख केला आहे. अगदी साध्या आणि सोप्या भाषेत विवरण अगदी थोडक्यात मानव जीवनाला सकारात्मक ऊर्जा देणारा हा संदेश दिला आहे. परंतु जेवढे आपण भारत देशमहासत्तेकडे घेऊन जात आहोत तेवढीच भारतीय नागरिकांमध्ये निराशेचे वातावरण पहायास मिळत आहे कारण सुख आणि समाधान हे मिळत नसल्याने किंवा आपल्या मनातील स्वप्न पूर्ण होत नसल्याने काही नागरिक आत्महत्येकडे वळताना दिसत आहेत.

2021 या सालामध्ये देशात एक लाख 64 हजार 33 आत्महत्या झाल्याचे एका वृत्तपत्राने जाहीर केले असून हा आत्महत्येचा आकडा महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) यांच्या अहवालानुसार 22207 हा आकडा महाराष्ट्रातील असून त्या पाठोपाठ तामिळनाडू नंतर मध्य प्रदेश पश्चिम बंगाल आणि कर्नाटक असा आत्महत्या ग्रस्थांची क्रमवारी लागली असून देशात या पाचच राज्यातील आत्महत्या या देशातील 50% पेक्षा जास्त आकडा जातो तर तर उर्वरित 23 राज्य आणि आठ केंद्रशासित प्रदेश यामध्ये 50% आत्महत्याग्रस्तांचा आकडा आहे. सर्वाधिक महाराष्ट्रामध्ये नैराश्याच्या छायेखाली जीवन जगत असल्याचे या आकडेवारीवरून दिसून येत आहे. आत्महत्ये मागील कारणे जरी वेग-वेगळी असली तरी जीवन संपवणे हे त्यामागील साध्य होऊच शकत नाही. त्यामुळे जीवन जगताना प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मक दृष्टिको पाहून कर्म करीत राहिल्यासआत्महत्यासारख्याविचारांपासूनआपणकोसोदूरराहू. कुठलाही देश ,धर्म ,जात ,पंत आत्महत्येचा पुरस्कार करत नाही. आत्महत्या करणारा आपल्या जीवनापुढे शरणागती पत्करत असतो जीवन जगण्याचे धाडस त्याच्यामध्ये नसते. परंतु आत्महत्या हे त्याचे पळपुटे धोरण कलंकीत करणारे आहे. त्यामुळे हसत-खेळत जगा मृत्यू तर अटळच आहे.

# शहाजी राजेंचे बंदी कोण झाले होते ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी


**_शहाजीराजे भोसले हे छ.शिवाजी राजे भोसले यांचे वडील आणि मालोजी राजे भोसले यांचे ज्येष्ठ पुत्र होते. ते पराक्रम, युद्धप्रसंगीची बुद्धिमत्ता, उत्तम प्रशासन व स्वतंत्र राज्यकारभार हे मूलभूत गुण-कौशल्य असलेले ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपल्या कारकीर्दित निजाम, मुघल आणि आदिल सत्तेत सरदार म्हणून राहिले, तरी त्यांची महत्त्वाकांक्षा स्वतंत्र राज्य स्थापनेची होती. त्यांनी तसा दोनदा प्रयत्न केला, परंतु त्यास फारसे यश आले नाही. त्यांचे स्वप्न त्यांचे पुत्र छ.शिवाजी राजे महाराष्ट्र आणि व्यंकोजी राजे तंजावर यानी प्रत्यक्षात आणले. ही ज्ञानवर्धक माहिती श्री एन. के. कुमार गुरुजी यांच्या भारदस्त शब्दांत जरुर वाचा.**

मालोजी भोसले यांची पत्नी दीपाबाई- उमाबाई हिच्या पोटी सिंदखेड येथे शहाजींचा जन्म दि.१५ मार्च १५९४ रोजी झाला. शहाजी राजेंच्या जन्मतारखेबद्दल इतिहासकारांत नेहमीप्रमाणे मतभेद आहेत. बाबाजी राजे भोसले यांच्या घरात मालोजी राजे भोसले आणि उमाबाई भोसले यांच्या पोटी शहाजी राजे यांचा जन्म झाला. त्यांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या मातोश्री उमाबाईंनी अहमदनगरजवळील शहाशरीफ पीराला अहमदनगर जवळील मुकुंदनगर भागात तारकपूर बस स्टँडपाशी नवस बोलल्यामुळे त्यांनी आपल्या दोन्ही मुलांची नावे शहाजी व शरीफजी अशी ठेवली. पुढे सिंदखेडराजा येथील लखुजीराव जाधव यांच्या मुलीशी म्हणजेच जिजाबाईंशी शहाजीराजे यांचा डिसेंबर इ.स. १६०५मध्ये विवाह झाला. या वेळी लखुजीराव व मालोजीराजे हे दोघेही निजामशाहीत होते. पुढे लगेचच मालोजी राजेंचा दुर्दैवी मृत्यू झाला. कालांतराने जसेजसे शहाजी राजे मोठे होत गेले, तसतशी पराक्रम, राजकारण, मुत्सद्देगिरी या बाबतीत त्यांची कीर्ती वाढत सर्वदूर सुगंधासारखी पसरत गेली. मालोजी राजे भोसले हे आपला भाऊ विठोजी राजे भोसले यांचेसह सहकुटुंब सन १५७७मध्ये सिंदखेड येथे लाखुजीराजे जाधव यांच्याकडे नोकरीस आले होते. तद्नंतर शहाजींचे पिता मालोजी राजे यांनी लखुजीराजे जाधव यांची नोकरी सोडून इ.स.१५९९ साली अहमदनगरच्या निजामाची नोकरी मिळवली.

मुघल शहेनशाह औरंगजेब याने इ.स.१६२४ लष्कर खानला १.२ लाख सैन्यासह रवाना केले. सोबत आदिलशहा ८० हजार सैन्य घेऊन निघाला. शहाजी राजेंकडे २० हजार सैन्य होते. त्यातील १० हजार अहमदनगरच्या रक्षणासाठी ठेवून तेवढेच त्यांनी स्वतःकडे ठेवले. एवढ्या मोठ्या सैन्याला प्रचंड पाणी लागेल म्हणून मुघल आणि आदिलशाही सैन्याने उत्तर-दक्षिण वाहणाऱ्या मेखरी नदीजवळ भातवडी येथे छावणी उभी केली. एरवी दुष्काळग्रस्त असलेल्या अहमदनगरला तेव्हा चांगला पाऊस झाला होता. शहाजी राजेंनी छावणीच्या उत्तरेस धरणाला असे तडे पाडले, की रात्री झोपलेल्या मुघल आणि आदिलशाही छावणीची काही कळण्यापूर्वीच वाताहात झाली. तेव्हा अनेक योद्धे शहाजी राजेंचे बंदी झाले आणि त्यांचे नाव भारतवर्षात दुमदुमले. याच लढाईत त्यांचे बंधू शरीफजी धारातीर्थी पडले. भातवडी हे गाव अहमदनगरपासून पंधरा किमी अंतरावर आहे. नंतर निजामशाही वजीर, फतेह खान, जहान खान यांनी निजामाला मारले आणि राजांना निजामशाहीसाठी मिळवले. शहाजहानने दरम्यान निजामशाहीतील सगळ्या पुरुषांना ठार करविले. उद्देश असा की निजामशहीला वारस रहाणार नाही. तेव्हा राजांनी निजामाच्या नात्यातील छोट्या मुर्तझाला गादीवर बसवून स्वतः कारभार हाती घेतला, जणू स्वतःवरच छत्र धारण केले. ही घटना अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील पेमगिरी किल्ल्यावर घडली. त्यांचा हा स्वतंत्र राज्यकारभार जवळजवळ तीन वर्षे टिकला होता. त्यानी मुर्तझाच्या आईला त्याच्या सुरक्षिततेची हमी दिली.

दिल्लीचा बादशहा शहाजहानने ४८ हजार सैन्य निजामशाही व आदिलशाही संपवण्यासाठी पाठवले; तेव्हा घाबरून आदिलशहा हा शहाजहानला मिळाला. शहाजी व निजामशाहीचा टिकाव लागणे शक्य नव्हते, तरीही शहाजीने नेटाने लढा चालू ठेवला. दरम्यान छोटा मुर्तझा शहाजहानच्या हाती लागला. तेव्हा त्याच्या सुरक्षिततेसाठी आणि त्याच्या आईला दिलेल्या शब्दासाठी त्यांनी शहाजहानशी तह केला. या तहांतर्गत मुर्तझा शहाजहानकडे सुरक्षित राहील आणि शहाजी आदिलशाहीला मिळेल. शहाजहानने सावधगिरी म्हणून शहाजीराजांना दक्षिणेला बंगळूरची जहागिरी दिली. बेंगलोर विजयनगर साम्राज्य जे एक जहागिरदार, केम्पे गौडा १ यांचेद्वारे सन १५३७मध्ये स्थापित केले गेले होते, त्यांनी विजयनगर साम्राज्यामधून स्वातंत्र्याची घोषणा केली होती, त्याला सन १६३८मध्ये त्यांचा उपसेनापती, शाहजी भोसले यांच्यासोबत रानादुल्ला खान यांच्या नेतृत्वाखाली एक बड़ी आदिलशाही बीजापुर सेनाद्वारे बेंगलोरवर कब्जा केला गेला होता, ज्यांनी केंम्पे गौडा ३ यांना पराजित केले होते आणि बेंगलोरचे शाहजी यांना जहागिर- संपत्तीच्या स्वरूपात बहाल केली गेली होती. आदिलशाहीत असताना शहाजीराजांनी पुणे परगणा निजामशाहीकडून काबीज केला होता, तोही त्यांच्याकडेच ठेवला.

शहाजीराजांना बंगळूरचा प्रदेश फार आवडला. शहाजीराजे व त्यांचे थोरले चिरंजीव संभाजी राजे यांनी आपल्या मनातील स्वराज्य संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचे या ठिकाणी ठरविले. शहाजी मुळातच उत्तम प्रशासक व पराक्रमी योद्धे होते. त्यांनी दक्षिणेतील राजांवर विजय मिळवून दक्षिणेला आदिलशहीचा विस्तार केला. पण हे करताना त्या हरलेल्या राजाना शिक्षा किंवा देहदंड न करता त्यांना मांडलिक केले. त्यामुळे गरज पडली तेव्हा हे राजे शहाजींच्या मदतीला आले. राजांनी आपले पुत्र छ.शिवाजी



महाराजांना पुण्यात आपल्या जहागिरीवर स्वतंत्र कारभार चालविण्यासाठी पाठवून स्वराज्य स्थापनेसाठी बरीच अनुकूल परिस्थिती निर्माण करून दिली. छ.शिवाजी राजांबरोबर बाजी पासलकर, रघुनाथ बल्लाळ अत्रे, कान्होजी जेधे नाईक व सातारचे शिंदे देशमुख हेही पुण्यात आले. राज्य कारभारासाठीची आवश्यक राजमुद्राही शहाजी राजांनीच शिवरायांना दिली. छ.शिवरायांच्या वाढत्या कारवायांना पायबंद घालण्यासाठी आणि शहाजी राजांची यांस फूस आहे, या संशयाने आदिलशाहीने मुख्य वजीर नवाब मुस्तफाखान याने बाजी घोरपडे, मंबाजी भोसले, बाजी पवार, बाळाजी हैबतराव, फतेहखान, आझमखान यांच्या साहाय्याने शहाजी राजांना दगा देऊन कर्नाटकातील जिंजीजवळ कैद केले. साखळदंडांनी बांधून भर विजापुरातून शहाजीराजांना दरबारात हजर करण्यात आले. तो दिवस होता दि.२५ जुलै १६४८चा. हे कळताच छ.शिवाजी महाराजांनी मुत्सद्दीपणाने राजकारण करत दिल्लीत मोगल सुलतान शहाजहानला एक पत्र पाठवले. स्वतः आपण व आपले पिता शहाजी राजे हे दिल्लीपतीची चाकरी करू इच्छितात, असे त्यांनी लिहिले. या बदल्यात शहाजीराजांची विजापूरच्या कैदेतून मुक्तता करावी, ही अट घातली. अशा प्रकारे छ.शिवाजी महाराजांनी शहाजीराजांच्या सुटकेसाठी दिल्लीच्या बादशहाला मधाचे बोट लावले, हा प्रयत्न यशस्वी ठरला. शहाजीराजांची दि.१६ मे १६४९ रोजी सन्मानपूर्वक सुटका झाली. अफझलखान स्वराज्यावर चालून आला तेव्हा अफझलखानाची दगाबाजी माहिती असल्याने शहाजीराजेंनी १७ हजार फौज विजापूरबाहेर खडी ठेवली होती.

शहाजीराजांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला असता असे लक्षात येते, की त्यांनी स्वाभिमान राखत आदिलशाही, मुघलशाही व निजामशाही या सर्व सत्ताधीशांकडे काम केले. त्यांच्या कारकिर्दीचे महत्त्वाचे टप्पे असे- सन १६२५ ते १६२८- आदिलशाही, सन १६२८ ते १६२९- निजामशाही, सन १६३० ते १६३३- मुघलशाही, सन १६३३ ते १६३६- निजामशाही, सन १६३६ ते १६६४- आदिलशाही पुढे सन १६६१ ते १६६२ दरम्यान शहाजीराजे महाराष्ट्रात आले होते. त्यांनी त्यानंतरचा काही काळ छ. शिवाजीराजे व जिजाबाईंसमवेत घालवला. आपण लावलेल्या स्वराज्याच्या रोपट्याचा आज विशाल वटवृक्ष झाल्याचे पाहून ते धन्य झाले. काही काळानंतर ते पुन्हा आपल्या जहागिरीत परतले. माघ शुद्ध ५, म्हणजेच दि.२३ जानेवारी १६६४ रोजी होदेगिरीच्या जंगलात शिकारीला गेले असताना त्यांच्या घोड्याचा एका वृक्षवेलीमध्ये पाय अडकला व ते खाली कोसळले आणि त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजीराजांनी राजपरंपरेप्रमाणे शहाजीराजांची उत्तरक्रिया केली व समाधी शिमोग्याजवळ होदेगिरी जिल्हा दावणगिरी- कर्नाटक येथे बांधली.

!! शहाजी राजेंना त्यांच्या पुण्यस्मरणदिनी विनम्र अभिवादन !!

# राष्ट्रभक्तीचा तेजस्वी सूर्य सुभाषचंद्र बोस !



श्रावण भवर
संपर्क 9421932704

आधुनिक केसरी

**भारतमाता, अखिल विश्वात "माता" हे बिरूद असलेलं एकमेव राष्ट्र भारत राष्ट्र.. समस्त विश्वाला विश्वबंधुत्वाच,शांतीचं, समतेचं आणि एकात्मतेचं दर्शन घडवणारे राष्ट्र म्हणजे भारत देश. या भारत मातेने अनेक महान सुपुत्रांना जन्म दिला. आपली अढळ छाप या विश्वावर पाडत भारतमातेचे सुपुत्र आपलं कर्तव्य निभावत आहेत. भारतीय इतिहासात आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या, आत्मविश्वासाच्या जोरावर भारतमातेला इंग्रजांच्या पाशवी बेड्यातून मुक्त करण्यासाठी , आपल्या प्राणांची समिधा या स्वातंत्र्य समर यज्ञकुंडात हसत हसत स्वाहा करणारे क्रांतिकारी स्वातंत्र्यसेनानी भारतपुत्र सुभाष चंद्र बोस यांची 127 व्या जयंतीनिमित्त...**

हिंदुस्तानचे हृदय म्हणजे दिल्ली. आणि दिल्लीच्या काळजाची कळ म्हणजे लाल किल्ला.. अनेकांच्या महत्त्वाकांक्षी सुवर्ण पंखांचा झोपावता वारू तर अनेक पराक्रमी महापुरुषांच्या पुरुषार्थाची सुवर्ण लेखणीत सुवर्ण ऐतिहासिक नोंद असलेला किल्ला म्हणजे लाल किल्ला ...

याच लाल किल्ल्यावर भारताचे तिरंगी निशाण अभिमानानं, मुक्तपणे डोलावं ही महत्त्वकांक्षा मनात जपून ठेवलेले नेताजी सुभाष चंद्र प्रभावती देवी जानकीनाथ बोस...

23 जानेवारी 1897 साली सुभाषबाबूंचा ओरिसातील कटकमध्ये जन्म झाला. स्कॉटिश चर्चेस कॉलेज मध्ये आपल पदवी पर्यंत शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर नेताजी सुभाष बाबू 1919 मध्ये इंग्लंडला इंडियन सिविल सर्विस या उच्च शिक्षणासाठी गेले. इंडियन सिविल सर्व्हिस ची परीक्षा मेरिट मध्ये पास होऊन 1921 ला भारतात परत आले. तत्कालीन इंडियन सिविल सर्व्हिस ही परीक्षा पास होन फार अभिमानच, गौरवाच समजलं जाई.

भारतात आल्यानंतर सुभाष बाबूच्या मनावर देशबंधू चित्तरंजन दास यांच्या कार्याचा प्रचंड प्रभाव पडल्यामुळे ते त्यांच्याशी जोडल्या गेले, ते शेवटपर्यंत.. तेव्हा भारतात महात्मा गांधी यांच्या विचारांचा समस्त भारतीयांवर प्रभाव होता. भारताच्या प्रत्येक नागरिकांच्या मनावर महात्मा गांधींजीच्या अहिंसेने आधीराज्य प्रस्थापित केलं होतं.

तत्कालीन वेगळा विचार मांडण्याचं काम नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी केलं. नेताजी सुभाष बाबूनीं 1938 हरिपुरा येथील आणि 1939 मध्ये त्रिपुरा येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले होते. काँगेस पक्षात मतभेद झाल्यामुळे 3मे1939 साली फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची सुभाष बाबूंनी स्थापना केली.1939 साली दुसरे महायुध्द सुरू झाले. दुसऱ्या महायुद्धात इंग्रज सरकार भारतीय नागरिकांना आपल्या पक्षात उभे करून शत्रू पक्षावर वर चढाई करण्याचा प्रयत्न करत होते.

दुसऱ्या युद्धात इंग्रज भारतीय नागरिक, पैसा ,मनुष्यबळाचा पुरेपूर वापर करून घेत होते. या धोरणां ला सुभाष चन्द्र बोस यांचा विरोध होता. सुभाष बाबू म्हणत राष्ट्रीय सभेने ब्रिटिश शासना विरुद्ध क्रांतीचे आवाहन करावे. भारतीय जनतेने इंग्रजांना कोणत्याही प्रकारची मदत करू नये. हीच वेळ आहे भारताला ब्रिटिशांच्या पाशवी जाळ्यातून भारतमातेला मुक्त करायची. शत्रूचा शत्रू आपला मित्र या कुटनीतीचा, रणनीतीचा आधार



घेउन भारताने जपानची मदत घेऊन ब्रिटिशांच्या विरोधात आवाज उठवावा. परंतु राष्ट्रीय काँग्रेसने नेताजींच्या मताला विशेष महत्त्व दिले नाही. याच संदर्भात पंडित नेहरू आणि महात्मा गांधी यांच्याशी नेताजीचे मतभेद झाले. याचाच फायदा गोऱ्या सरकारने घेऊन सुभाषबाबूंना युद्ध प्रयत्न विरोधी आंदोलनात भाग घेतल्याच्या आरोपात बंदिवासात टाकण्यात आले. तुरूंगात यांनी प्राणांतिक उपोषण केले.कालांतराने ब्रिटिशांनी त्यांना त्यांच्याच घरात नजरकैदेत ठेवले.. एप्रिल 1941मध्ये नेताजी सुभाष बाबू भारत सोडून जर्मनीला गेले. तेथे त्यांनी रासबिहारी बोस यांनी स्थापन केलेली 'आझाद हिंद सेनेची' धुरा हाती घेतली. परकीय भूमीत राहून भारतमाता मुक्त करण्यासाठी जपान, इटली,जर्मनीशी चांगले संबंध निर्माण केले. भारतमातेला मुक्त करण्याच्या कार्यात स्वतःला वाहून घेतलं.. आझाद हिंद सेनेचे निशान,तिरंगी ध्वज, अभिवादन शब्द जयहिंद हे शब्द आजही प्रत्येक भारतीयाच्या मनामनात अधिराज्य करत आहेत... भारताला स्वतंत्र करण्यासाठी बलिदान हवं. या स्वातंत्र्य संग्रामाच्या यज्ञकुंडात रक्ताची, प्राणाची समिधा अर्पण करण्यासाठी, स्वाहा करण्यासाठी तुम मुझे खून दो ,मैं तुम्हे आजादी दूंगा चा नारा नेताजींनी सर्व भारतीयांना दिला. प्रत्येक भारतीयाच्या मनामनात, नसानसात अन् जनमानसात भारतमाते चे अचल, अढळ प्रेम निर्माण केले. 24 ऑक्टोबर 1943 साली नेताजींनी इंग्लंड आणि अमेरिका यांच्या विरुद्ध युद्धाची घोषणा देऊन नवचैतन्याच, नव समाजक्रांतीच,बलिदानाचे आवाहन केले. आझाद हिंद सेना भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची समिधा या स्वातंत्र्य यज्ञकुंडात स्वाहा करण्यासाठी सज्ज झाली. अनेकांनी या स्वातंत्र्य यज्ञ कुंडात आपले सर्वस्व भारत मातेच्या चरणी अर्पण केले.

जपान मधील हिरोशिमा नागासाकी त अमेरिकेने टाकलेल्या बॉम्ब मुळे दुसऱ्या महायुद्धा चे सगळे गणित बदलले. यात अमेरिकेने जपानला हरवलं. पर्यायी जपान पुरवत असलेली रसद आझाद हिंद सेनेला मिळणं बंद झाली. त्यामुळे आझाद हिंद सेना आपले लक्ष्य गाठू शकली नाही. भारतात ब्रिटिश विरोधी भूमिका बजावल्यामुळे आझाद हिंद सेनेचे मेजर जगन्नाथराव भोसले,मेजर शहनवाज ,कॅप्टन धिल्लन, कॅप्टन सहगळत, कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन सहल यांच्या विरोधात खटले भरले.वकील असून सुद्धा कधीच वकीली न केलेल्या पंडित नेहरुंनी न्यायालयात आझाद हिंद सेनेच्या शिलेदारांना मुक्त केले होते. युद्ध चालू असतानाच दिनांक 18 ऑगस्ट 1945 ला टोकियो कडे विमानाने जात असताना विमान अपघात झाला. इतिहासाच्या पानावर आपल्या प्रबळ इच्छाशक्तीच्या, आत्मीविश्वासाच्या जोरावर इंग्रजांशी चार हात करणाऱ्या या महान महानायका चा मृत्यू झाला. आणि एका नव्या इतिहासाचा अंत सुद्धा. या वन मॅन आर्मी असलेल्या महायोद्धास आजच्या शुभ दिनी कोटी कोटी अभिवादन.

# आक्रोश मोर्चात हिंदूंच्या एकजुटीचे दर्शन

## विविध संस्था, संघटना व राजकीय पक्षांचा उत्स्फूर्त सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भगव्या टोप्या, भगवे झेंडे, जय श्रीराम आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या घोषणा अशा वातावरणत निघालेल्या मोर्चाच्या माध्यमातून रविवारी पुण्यात अखिल हिंदू समाजाची एकजूट दिसून आली. हजारोंच्या संख्येने यावेळी हिंदू बांधव मोर्चात सहभागी झाले होते. विविध संघटना, राजकीय पक्ष व संस्थांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिन म्हणजे फाल्गुन अमावस्या धर्मवीर दिन जाहीर  करावा तसेच लव्ह जिहाद, धर्मांतर आणि गोहत्या यांच्या विरोधात कडक कायदे करून त्यांची अंमलबजावणी व्हावी, या प्रमुख मागण्यांसाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती घराण्याचे वंशज आमदार शिवेंद्रसिंह राजे भोसले, संत तुकाराम महाराजांचे वंशज ह. भ. प. मोरे, हिंदुत्ववादी नेते धनंजय देसाई आणि तेलंगाणाचे आमदार राजा सिंह उर्फ राजा भैया यांची मोर्चात प्रमुख उपस्थिती होती.

लाल महाल येथे राजमाता जिजाऊ यांना अभिवादन करून मोर्चाची सुरुवात झाली. त्यानंतर दगडूशेठ हलवाई गणपती येथे महाआरती केल्यानंतर हा मोर्चा लक्ष्मी रस्ता मार्गे डेक्कन जिमखाना येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत आला. तेथे झालेल्या सभेनंतर मोर्चाचे समापन झाले.

यावेळी झालेल्या सभेत बोलताना आ. शिवेंद्रसिंह राजे भोसले म्हणाले, "आज या मोर्चाच्या रूपाने मला हे भगवे वादळ दिसत आहे. हिंदू धर्मातील सर्व जाती पातीचे लोक आज एकत्र आले आहेत. हिंदू धर्माचे रक्षण झाले पाहिजे हीच आपली सर्वांची भावना असून देव, देश आणि धर्माच्या रक्षणात कोणतीही तडजोड होऊ शकत नाही. आता एकत्र आल्याशिवाय आपल्याला पर्याय नाही. आम्ही कोणाचाही द्वेष करायला एकत्र आलेलो नाहीत. म्हणूनच आम्ही कोणाच्याही विरोधात घोषणा दिल्या




नाहीत. महापुरुषांच्या इतिहासाबाबत वक्तव्ये करणाऱ्यांचा समाचार घेताना ते म्हणाले, की आपलं मतदान टिकला पाहिजे, राजकारण झालं पाहिजे म्हणून काही जण बालिश वक्तव्ये करत आहेत. छत्रपती संभाजी महाराजांचे स्मृतीस्थळ हे पर्यटनस्थळ म्हणून जाहीर ना करता तीर्थस्थळ म्हणून जाहीर करावे, आधी मागणीही त्यांनी केली. धनंजय देसाई यांनी सर्वांना एकजूट राखण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की शक्तिवाचून धर्म दुष्ट ठरतो आणि धक्तिवाचून धर्म दुर्बळ ठरतो. म्हणून आपली एकजूट हीच शक्ती आहे. यावेळी जोषपूर्ण भाषण करत राजा सिंह ठाकूर यांनी उपस्थितांची मने जिंकली. ते म्हणाले, हा आक्रोश नसून हिंदूंची गर्जना आहे. महाराष्ट्रातील मावळ्यांमध्ये जेवढे हिंदुत्व दिसते तेव्हढे अन्य कुठेही दिसत नाही. धर्मांतराच्या विरोधात लढणे हे आपले सर्वांचे परम कर्तव्य आहे. आता प्रत्येक हिंदूला सैनिकाप्रमाणे सज्ज व्हावे लागेल. संपूर्ण भारतात लव्ह जिहादचे कारस्थान पसरत आहे. लिव्ह जिहादच्या विरोधात देशात कायदा बनला पाहिजे. आम्हाला कोणाशीही संघर्ष करायचा नाही कारण भारतात सुख व शांती नांदावी हीच आमची इच्छा आहे. गोहत्येबाबत ते म्हणाले की गाय ही आमची माता असून आम्ही गाईची कत्तल होऊ देणार नाही. ज्या पुण्येश्वर मंदिरावरून पुण्याचे नाव पडले ते मंदिर अतिक्रमणातून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारवर दबाव आणावा. तेथे महाआरती झाली तर मी सर्वात आधी येईन, असे ते म्हणाले.

# शौचालयात आढळला बालकाचा मृतदेह

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** संत पेठ परिसरातील महात्मा फुले चौकाच्या



जवळील सार्वजनिक शौचालयात काल मध्यरात्री एका मुलाचा मृतदेह आढळून आला. या घटनेने परिसरात प्रचंड खळबळ उडाली. दहा वर्ष वयाच्या मुलाच्या मृतदेहाची अवस्था देखील अत्यंत वेदनादायी होती. मृत्युमुखी पडलेल्या या मुलाची ओळख देखील पटली असून कृष्णा तम्मा धोत्रे असे त्याचे नाव आहे मृतदेहाचे पोट पूर्णपणे फाडून टाकले आहे ही अवस्था पाहता या बालकाचा खून झाल्याची शंका अनेकांना येत असून त्याच्या कुटुंबीयांनी देखील असा संशय व्यक्त केला आहे त्यामुळे या घटनेला वेगळे वळण लागणे शक्यता आहे. सदर बालकाचे पोट मोकाट जनावरांनी काढल्याची शक्यता काहींनी व्यक्त केली परंतु या शक्यतेला आधार मिळत नाही. गजबजलेल्या परिसरात जनावरांनी हल्ला केला असता तर तो आजूबाजूच्या लोकांच्या वेळेत लक्षात आले असते शिवाय त्याचा मृतदेह सार्वजनिक शौचालयात  आढळून आला आहे. बालकाच्या नातेवाईकाकडून मात्र हा कोणाचा प्रकार असल्याचे म्हटले जात आहे या एकंदर घटनेने आधी संत पेठ परिसरात आणि नंतर मात्र संपूर्ण शहरात खळबळ आणि चर्चेचा विषय बनला आहे घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून मृतदेहाचा पंचनामा करण्यात आला आहे वेगवेगळ्या चर्चा आणि वेगवेगळ्या अंदाज व्यक्त होत असले तरी पोलिसांच्या तपासात या घटनेतील सत्य समोर येणार आहेत परंतु एकूण परिस्थिती लक्षात घेता. हा खून असल्याचीच शक्यता व्यक्त होत आहे. प्रकरण गूढ आणि रहस्यमय बनले असून पोलिसांच्या तपासात आणि वैद्यकीय अहवालात काय समोर येते याची प्रतीक्षा लागली आहे.

# प्रीती कापसेची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**बजाजनगर :** रांजणगाव पोळ येथील



लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी प्रीती रामेश्वर कापसे ची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी नुकतीच निवड  झाली आली आहे. औरंगाबाद येथे नुकत्याच विभागीय स्तरावर कुस्ती स्पर्धा पार पडली या स्पर्धेत 43 किलो वजनी गट व 17 वर्षाच्या वयोगटात प्रीती रामेश्वर कापसे ने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला.त्यामुळे तिची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला पैलवान करतारसिंग जारवाल, रतनसिंग जारवाल, सुनील बडेकर, तिचे वडील पैलवान रामेश्वर कापसे व शाळेचे क्रीडा शिक्षक शिवाजी महाजन यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक कृष्णा पाटील डोणगावकर,अध्यक्ष इंदुमतीताई डोणगावकर, सचिव देवयानीताई डोणगावकर, शालेय समिती अध्यक्ष शिवाजीराव बोडखे, उपाध्यक्ष भाऊसाहेब पाटील बोडखे, मुख्याध्यापक सुधाकर थोरात,गोविंद हिवाळे, आयुब शेख, राजेंद्र देवके, सतीश कहाटे, प्रशासकीय अधिकारी संतोष मल्लनाथ, विलास जाधव, अनिल कुमावत, डी.पी. चिमणकर, रामेश्वर शेळके, के.बी.मोरे, सी.एच.गायकवाड, ए. एन.शेख, आर, एच. शिरसाट, तुकाराम शेलार,प्रतिभा नितनवरे, आनंद बोडखे, ए एस बिरोटे, बी जे पांडव यांच्या सर्व शिक्षक व शिक्षक इतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# प्रकाश क्षीरसागर यांना संकल्प फाउंडेशनचा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** ता.तिरपण येथील संकल्प फाउंडेशनतर्फे महागाव येथे गोमंतकीय साहित्यिक प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांना संकल्प साहित्य पुरस्कार हल्लीच प्रदान करण्यात आला. यावेळी संकल्प फाउंडेशनचे अध्यक्ष युवराज युवराज सरनोबत, दै. लोकमतचे संजय पाटील व आसपासच्या परिसरातील सरकारी अधिकारी आणि मोठ्या प्रमाणात शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. संकल्प फाउंडेशनचे प्रा. रसूल सोलापूरे यांनी प्रास्ताविक केले. पी. डी. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या पुरस्काराने लेखकांना प्रोत्साहन व प्रेरणा मिळेल असे मत वक्त्यांनी व्यक्त केले. प्रमुख पाहुणे बाबासाहेब वाघमोडे यांनी आपल्या भाषणात गडहिंग्लड तालुक्याच्या साहित्य परंपरेचे



कौतुक केले. प्रकाश क्षीरसागर यांच्या समवेत चिपळूणचे मुझफ्फर सय्यद, प्रा.डॉ. जनार्दन भोसले, डॉ. देविदास गेजगे यांच्या सह महाराष्ट्रातील वीस साहित्यिकांना गौरविण्यात आले. प्रकाश चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. युवराज सरनोबत यांनी आभार मानले. यावेळी भारत सातपुते यांचा खास गौरव करण्यात आला.

# अनिल कपूर आणि आदित्य रॉय कपूर १७ फेब्रुवारी २०२३ रोजी रिलीज होणाऱ्या 'द नाईट मॅनेजर'मध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** हॉटस्टार स्पेशलची अप्रतिम मालिका, द नाईट मॅनेजर, द इंक फॅक्टरी आणि बनजय एशिया निर्मित, संदीप मोदी निर्मित आणि दिग्दर्शित आणि प्रियांका घोष सह दिग्दर्शित. दोन पॉवरहाऊस, दोन वेगवेगळ्या बाजू आणि जोरदार हाणामारी - यावर्षीची सिनेमॅटिक एन्काउंटरमध्ये शैली रुंगटा आणि शंतनू सेनगुप्ता यांच्यातील संघर्ष पाहण्यासाठी सज्ज व्हा! म्हणजे तू डिस्ने + हॉटस्टार बदला, फसवणूक आणि खळबळजनक खुलासे यांचा थ्रिलर घेऊन येतो. बहुप्रतिक्षित स्पाय थ्रिलर हॉटस्टार स्पेशलच्या द नाईट मॅनेजर ट्रेलरने जगाला भुरळ घातली आहे जारी केले आहे. द इंक फॅक्टरी आणि बनजय एशिया निर्मित, जॉन ले कॅरे यांच्या कादंबरीतून रूपांतरित नाईट मॅनेजरचे हे हिंदी रूपांतर संदीप मोदी आणि प्रियंका घोष यांनी तयार केले आणि दिग्दर्शित केले. दिग्दर्शित. तर आप भी १७ फेब्रुवारीपासून द नाईट मॅनेजरसोबत फक्तडिस्ने + हॉटस्टारवर रहस्ये आणि षड्यंत्रांच्या जाळ्यात उघड होण्यासाठी सज्ज व्हा! वास्तविकता अनेकदा दिसते त्यापेक्षा वेगळी असते... हा एक विचार आहे जो तुम्हाला शैली देतो रुंगटा आणि शानच्या जगात खोलवर जाण्यास भाग पाडेल. जेव्हा सत्तेची भूक लागते तेव्हा शेली नावाचा माणूस शान आणि त्याची RAW जोडीदार लिपिका (तिलोत्तमा शोमने खेळलेली) दानीशी स्पर्धा करतात. असे घडल्यास, शान आणि लिपिकाचा हेतू असा आहे की ते शेलीचा गुप्त शस्त्र व्यापार आणि गुप्तचर आहेत विभागाचे संगनमत तसेच शेलीचे सहकारी बीजे (सास्वता चॅटर्जी यांनी भूमिका केली आहे) आणि जयू

(रवी बहलने खेळलेला) देखील काढून टाकला पाहिजे. या मालिकेत शोभिता धुलिपाला उर्फ कावेरी रुंगटाच्या उत्साही आणि हटके मैत्रिणीची भूमिका साकारली. या मालिकेत अनिल कपूर, आदित्य रॉय कपूर, शोभिता हे उच्च नाटक आणि नेत्रदीपक दृश्ये आहेत. धुलिपाला, तिलोत्तमा शोम, सास्वत चॅटर्जी आणि रवी बहल यांसारखे दमदार कलाकार सशक्त भूमिका करतात. निर्माता आणि दिग्दर्शक संदीप मोदी म्हणाले, द नाईट मॅनेजर ही एक अतिशय मनोरंजक



आणि मनोरंजक कथा आहे. थ्रिलरचे परिपूर्ण मिश्रण जे प्रेक्षकांना त्यांच्या सीटच्या काठावर ठेवेल. अनिल कपूर आणि आदित्य रॉय कपूर सारख्या इंडस्ट्रीतील सर्वोत्कृष्ट अभिनेते आणि जगभरातील नामवंत तंत्रज्ञांनी या शोसाठी योगदान दिले आहे. आपल्या दृष्टीला जीवन देण्यासाठी त्याने आपले सर्वस्व अर्पण केले आहे. नाटक, कारस्थान आणि नेत्रदीपक दृश्ये ग्लॅम, स्टाइल आणि प्रत्येक एपिसोडमध्ये उलगडणाऱ्या पात्रांनी भरलेला एक हाय-ऑक्टेन थ्रिलर, द नाईट मॅनेजर हा संघर्षाचा प्रवास आहे. डिस्ने + हॉटस्टार सोबत काम करणे हा एक चांगला अनुभव होता आणि आम्ही आहोत. आकर्षक कथानकाने प्रेक्षकांना गुंतवून ठेवण्याची आणि त्यांचे मनोरंजन करण्याची आशा आहे. अभिनेता अनिल कपूर उर्फ शेली रुंगटा म्हणाला, स्पाय थ्रिलरमध्ये जबरदस्त ट्विस्ट आणि सरप्राईज असतील. खुलासे होतात, आणि प्रेक्षक द नाईट मॅनेजरमध्ये देखील एक आश्चर्यकारक अनुभव घेतील. शेली रुंगटा स्पष्टपणे फार वाईट, त्याची पुढची हालचाल काय असेल किंवा तो या सगळ्या गोंधळात काय करणार आहे याचा अंदाज तुम्ही कधीही लावू शकत नाही. मागे आहे. पण नंतर एका ट्विस्टमध्ये त्याला त्याची मॅच मिळते आणि त्यानंतर शोला जो ट्विस्ट येतो. प्रेक्षकांना त्यांच्या जागेवर चिकटून ठेवेल. डिस्ने + हॉटस्टार सह, आम्ही ही मालिका जागतिक प्रेक्षकांपर्यंत नेत आहोत. सादर करण्यासाठी खूप उत्सुक. अभिनेता आदित्य रॉय कपूर म्हणाला, जेव्हा सूड आणि विश्वासघात यांचे मिश्रण असते तेव्हा हाय व्होल्टेज ड्रामा केले जाईल. नाईट मॅनेजर या नाटकात आकर्षक पात्रांसह एक ठोसा बांधतो. म्हटल्याप्रमाणे अजूनही पाणी खोलवर वाहते आणि माझे पात्र शानही याच म्हणीप्रमाणे जगते. चे प्रतीक आहे. त्याच्या मनात काय चालले आहे हे कोणीही सांगू शकत नाही, परंतु तुम्हाला माहिती आहे. सर्व काही अतिशय वेगाने बदलत आहे आणि कथा एका आश्चर्यकारक वळणावरून दुसऱ्याकडे जाते. भारतीय चित्रपट उद्योगातील काही उत्कृष्ट प्रतिभांसोबत काम करण्याचा अनुभव खूप चांगला आहे. जे डिस्ने + हॉटस्टार च्या डायनॅमिक टीमने एकत्र केले आहेत.



संपूर्ण देशात नेताजी सुभाष चंद्र बोस यांची जयंती ही पराक्रम दिवस म्हणून साजरी केली जाते. त्याचप्रकारे धुळे जिल्ह्यात शाळा व महाविद्यालय कॉलेज येथे अनेक सांस्कृतिक उपक्रम व नाट्य कला सादर करून अनोखी आदरांजली वाहिली जाते. या ठिकाणी जय हिंद शैक्षणिक ट्रस्ट धुळे संचलित कै. पू. ब. ना. कुंभार गुरुजी मराठी शाळा, जिजामाता कन्या विद्यालय, एस.एस.वि.पी.एस कॉलेज व अनेक शाळा महाविद्यालय सहभागी झाले. त्यात जय हिंद शैक्षणिक ट्रस्ट संचलित राजे छत्रपती संभाजी विद्यालय यांनी अनोखा खान्देशी नृत्य व आदिवासी परंपरेतील सांस्कृतिक नृत्य सादर केले या नृत्याला पाहण्यासाठी संतोषी माता चौक येथे नागरिकांची गर्दी लोटावत होती. हे नृत्य पाहून भारावून गेलेत व टाळ्यांच्या गडगडात होता.

# प्रेरणा बचत गट, गोंडपिपरीच्या वतीने हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडपीपरी :** मकरसंक्रांतीनिमित्य प्रेरणा महिला बचत गट,गोंडपिपरीच्या वतीने हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रथमतः गटातील जेष्ठ सदस्यांच्या हस्ते पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेला माल्यार्पण तथा अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रेरणा महिला बचत गटातील सर्व सदस्यांनी एकमेकींना हळदीकुंकू लावत आदरसत्कार करून सौभाग्याचे देणं म्हणून एकमेकांना वाण स्वरूपात भेट वस्तू देण्यात आले.याप्रसंगी बचतगटातील सर्व महिलांनी विविध खेळ,उखाणे,नृत्य करीत हळदीकुंकू कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. शेवटी स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रितीताई जिडकुंटवार, अध्यक्ष, मानसा समेटा, उपाध्यक्ष, रेणू अम्मावार सचिव, नरसाताई घर्षकुर्तीवार, लक्ष्मीताई घर्षकुर्तीवार, ममताताई विरुटकर, कविताताई परचाके, गोपिकाताई कोरडे माधुरीताई झाडे, आशाताई गायकवाड, वैजंतीताई कातर कर, रामेश्वरीताई मोरे सौ.अनिताताई अम्मावार, श्रीलताताई घर्षकुर्तीवार, वैशालीताई पुद्दटवार कु. साक्षी गायकवाड, सलोनी अम्मावार, अक्षरा समेटा यांनी उत्कृष्ठ नियोजनासाठी अथक परिश्रम घेतले.



# श्रीक्षेत्र रायपूर येथे आजपासून अखंड हरिनाम सप्ताह



आधुनिक केसरी न्यूज

**रामभाऊ आवारे**

**निफाड :** श्रीक्षेत्र रायपूर येथे संतधाम आश्रम या पवित्र पावन भूमीत संत सचिदानंद केरोबा महाराज, स्वानंद सुखनिवासी यादव महाराज, ब्रह्ममूर्ती पंढरीनाथ महाराज घोरपडे, ब्रम्हमूर्ती सोनार गुरुजी व वै हभप.अनिल महाराज कोल्हे (सर) यांच्या कृपाशिर्वादाने हभप तुकाराम महाराज शास्त्री, हभप शिवाजी महाराज भडाणेकर, हभप शांताराम महाराज गांगुर्डे (आळंदी देवाची) तसेच ज्ञानेश मिशन संस्था आळंदी देवाची यांच्या मार्गदर्शनाने तसेच पंचक्रोशीतील साधु संत, महंत यांच्या कृपेने तसेच पंचक्रोशीतील समस्त भाविक भक्तांच्या सहकार्याने ब्रह्मलिन श्री संत गुरुवर्य शाम महाराज शास्त्री यांच्या सातव्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आयोजन केले आहे. तरी आपण या ज्ञानामृताचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. कलश पूजन : ह.भ.प.तुकाराम महाराज परसुलकर, ह.भ.प. श्री. शिवाजी महाराज भडाणे, ह.भ.प. नारायण महाराज पंढरपुरकर, ह.भ.प. भिका बाबा रेडगाव, ह.भ.प. शिंदे माऊली रुई आश्रम, श्री. अशोक महाराज डोंगरे, श्री. आबा महाराज जाधव ,विणापुजन ह.भ.प.माधव महाराज शिंदेकर, ह.भ.प. पंढरीनाथ बाबा ढगे, ह.भ.प.बळीराम महाराज शिंदे, ह.भ.प.माधव (आण्णा) महाराज जाधव, ह.भ.प.शांताराम महाराज गांगुर्डे, ह.भ.प. निलेश महाराज पवार, ह.भ.प.विक्रम महाराज काळे, व्यासपीठ चालक ह.भ.प. संतोष महाराज भडाणेकर व ह.भ.प. सुकदेव महाराज चौधरी

दैनंदिन कार्यक्रम- पहाटे ४ ते ६ काकडा भजन, स. ७ ते १२ गाथा पारायण दुपारी २ ते ४ गाथा पारायण सायं. ४ ते ५ प्रवचन, सायं. ५ ते ६ वा. हरिपाठ, सायं. ६ ते ८ हरि कीर्तन व रात्री ८ ते १० संत भोजन होईल. मंगळवार २४ जानेवारी सायं. ४ ते ५.हभप. समाधान महाराज भाटगांवकर यांचे प्रवचन,सायं ६ ते ८ खांदेश रत्न हभप तुकाराम महाराज जेऊरकर यांचे कीर्तन, बुधवार २५ जानेवारी सायं. ४ ते ५ ह.भ.प.तुकाराम महाराज परसुलकर यांचे प्रवचन, सायं ७ ते ८ हभप पोपट महाराज कासारखेडेकर यांचे कीर्तन, गुरुवार २६ जानेवारी सायं ४ ते ५ ह.भ.प. रामनाथ महाराज शिलापुर यांचे प्रवचन, सायं ६ ते ८ हभप ज्ञानेश्वर माऊली कदम (मोठे माऊली) अध्यापक वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची, शुक्रवार २७ रोजी शुक्रवार सकाळी ८.३० ते ९.३० वा. गुरुवर्य शांतीब्रहा समन्वय महर्षी मारोती महाराज कुरेकर (बाबा) यांची भव्य दिव्य दिंडी मिरवणुक सकाळी १० ते १२ ह.भ.प.मारोती महाराज कुरेकर बाबा काल्याचे कीर्तन होईल तद्नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.

# मल्हारराव नाचण डोणगावकर यांची पंढरीरत्न उत्कृष्ट साहित्य लेखकरत्न पुरस्कारासाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिवस्वराज्य युवा संघटन पंढरपूर, महाराष्ट्र राज्य, यांच्या वतीने पंढरीरतन पुरस्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे.



साहित्यिक, शैक्षणिक क्षेत्रात मुक्तपत्रकारीतेच्या माध्यमातून गेल्या १५ वर्षापासून अविरत उल्लेखनीय केले गेलेल्या कार्याची दखल घेऊन शिवस्वराज्य युवा संघटन पंढरपूर संस्थापक अध्यक्ष यांच्या वतीने मल्हारराव नाचण डोणगांवकर छत्रपती संभाजीनगर, औरंगाबाद यांची पंढरीरत्न उत्कृष्ट साहित्य लेखकरत्न साहित्य लेखन या पुरस्कारासाठी निवड केली आहे. लवकरच मान्यवर ज्येष्ठ नामवंतांच्या हस्ते पंढरपुर स्थानी पुरस्कार वितरण केले जाणार आहे. सदरील पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल विविध स्तरातून मान्यवर, स्नेही, मित्र जणांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# बोईसरमध्ये मनसे नेत्याची डॉक्टरला मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**बोईसर :** मनसेचे पालघर जिल्हाप्रमुख समीर मोरे याने आपल्या समर्थकांसह बोईसर येथील डॉ. स्वप्नील शिंदे यांना बेदम मारहाण करीत रुग्णालयाची तोडफोड केली आहे. या मारहाणीत डॉक्टर गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी वापी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी मारहाण करणाऱ्या समीर मोरे आणि त्याच्या समर्थकांवर बोईसर पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करून नऊ जणांना अटक करण्यात आली आहे.

# वैजापुरात श्रीमद भागवत कथेस भाविकांची मोठी गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** या विश्वातील ज्या व्यक्तीवर परमेश्वराची कृपा होते त्या व्यक्तीवर जगाची कृपा होते, या साठी प्रत्येकाने परमपिता परमेश्वर यांच्यावर शुद्ध मनाने श्रद्धा ठेवावी व स्वतः बरोबर कुटुंब व समाजाचे कल्याण साधावे असे अमृत वचन भागवताचार्या श्री देवकीनंदन ठाकुरजी महाराज यांनी दि.२२/१/२३ रविवार रोजी जीवनगंगा वसाहती जवळील
कथा स्थळी केले, ते पुढे म्हणाले की चांगल्या कर्माचे फळ चांगलेच मिळते,आई -वडिलांची मनोभावे सेवा करावी त्यांची हेळसांड करू नये,वृद्धापकाळात त्यांची सेवा करावी, भागवत कथा श्रवण करून त्यातून जीवनाला विधायक व रचनात्मक कार्याकडे न्यावे असेही ते पुढे म्हणाले. या समयी सायंकाळच्या आरती समयी आ. प्रा. रमेश पा. बोरनारे, माजी आमदार भाऊसाहेब पा. चिकटगावकर, नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, कृष्णा पा. डोनगांवकर, जि.प.च्या माजी अध्यक्ष इंदूमती डोनगावकर, देवयानी डोनगावकर, मनाजी पा. मिसाळ, पारस घाटे, कार्यक्रम समिती अध्यक्ष राजू राजपूत, भावलाल काका सोमासे, गणेश खैरे सचिव प्रेम राजपूत, सम्राट तांबूस, कैलास पवार, अशोक पवार, सोनू राजपूत, मनोज राजपूत, योगेश राजपूत, किरण राजपूत,प्रमोद राऊत, मनीषा राजपूत, वर्षा राजपूत,शीतल राजपूत, दुर्गा राजपूत, मीना राजपूत, रेणू राजपूत याही सहकार्य करीत आहेत. सूत्र संचलन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. आभार प्रेम राजपूत यांनी मानले.





# पहूरच्या शिक्षकाचा वाघूर नदी संवर्धनासाठी जागर

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील - पहूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील प्रयोगशील शिक्षक शंकर रंगनाथ भामेरे यांनी ५० व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात 'होय मी नदी बोलतेय 'प्रकल्प सादर करून वाघूर नदी संवर्धनाचा जागर केला. जामनेर पूरा येथील ललवाणी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात पंचायत समिती शिक्षण विभागातर्फे नुकतेच सुवर्ण महोत्सवी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात शंकर भामेरे यांनी पहुर येथील वाघुर नदीचे आत्मवृत्त सादर करून वाघुर नदीची कथा आणि व्यथा व्यक्त केली. वाघुर नदीसह सर्वच नद्यांचे आपण संवर्धन करायला हवे असे आवाहन करून वाघुर नदीच्या पात्रातील प्रदूषण आणि कचऱ्याचे ढीग दूर करण्याच्या शिफारशी त्यांनी सुचवल्या. माध्यमिक शिक्षक गटातून त्यांनी सदर प्रदर्शनात सहभाग नोंदवून त्यांनी पर्यावरण आणि विज्ञान प्रेमींचे लक्ष वेधले. त्यांच्या प्रकल्पात गटशिक्षणाधिकारी रामकृष्ण लोहार, शिक्षण विस्तार अधिकारी विजय सरोदे, शिक्षण विस्तार अधिकारी एन. एफ. चौधरी, शालेय पोषण आहार अधीक्षक विष्णू काळे, प्राचार्य जे. पी. पाटील, पी . टी . पाटील, जी. जे. पाटील यांनी भेट देऊन कौतुक केले.

# वयाच्या चाळीशीने जिंकवला 'मास्टर श्री' चा किताब

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात अनेक निरनिराळे खेळ गाजवले आहेत त्यातला शरीर सौष्ठ स्पर्धा अनेक वर्षापासून मान उंचावत आहे. असाच एक धुळे महानगरपालिकेचा कर्मचारी गोविंद बळीराम साळवे यांनी 2004 ते 2005च्या दरम्यान धुळे श्री चे मानकरी ठरले होते. त्यानंतर तब्बल वयाच्या चाळीशीमध्ये मास्टर श्री चा किताब पटकावला व अनेक वर्षानंतर या वयात त्यांनी समाजात वेगळा संदेश दिला. धुळे शहरात १५ जानेवारी रोजी माजी मंत्री, आमदार जयकुमार रावल यांचा वाढदिवसानिमित्त धुळे शहरात शरीर सौष्ट् स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते. त्या सोर्धेत ऐकून २०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता, त्यात धुळे मनपाचा कर्मचारी गोविंद बळीराम साळवे यांनी मास्टर श्री (४०) वर्षा पुढील यात सहभाग नोडवला होता त्यात त्यांनी, आपले पिळदार शरिर दाखवत मास्टर श्री चे मानकरी झाले, गोविंद साळवे हे वयाच्या २० वर्षाचे असताना हि , धुळे श्री चे मानकरी ठरले होते , आणि पुन्हा वयाच्या ४१ व्या वर्षी ही त्यांनी धुळे मास्टर श्री चा खिताब आपल्या नावाचा केला , त्यांची ही कामगिरी बघत धुळे महा नगर पालिकेचे उप आयूक्त विजय सनेर, राजेंद्र माइंनकर, व धनंजय सोनार यांनी गोविंद साळवे यांचा सत्काराचा कार्यक्रम ठेवला .त्यात गोविंद साळवे यांना शुभेच्छा देत, त्यांचे कौतुक हि केले .



# रवींद्र तायडे यांचा पोलीस अधीक्षकांकडून सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी रवींद्र तायडे यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाबद्दल जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी प्रशस्तीपत्र देऊन नुकताच सन्मान केला आहे. रविंद्र तायडे यांनी त्यांच्या पोलीस स्टेशन हद्दीत कोणीतरी अवैध रित्या गांजाची लागवड केलेली असल्याचे त्यांना खब-याकडून माहिती मिळाली होती त्या माहिती नुसार या कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी रविंद्र तायडे यांनी सापळा रचून आपल्या अधिका-यासह धाड टाकली त्यावेळी धाडीत तब्बल 3,15,650 रुपये किमतीचे अवैध गांजाची झाडी जप्त करुन ती लागवड करणाऱ्या इसमास ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध कारवाई केली होती.
सदरचा गौरव सोहळा हा जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयात पार पडला.
पोलीस अधीक्षक कार्यालय औरंगाबाद येथे सोयगाव पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी रविंद्र तायडे पो. अ./1542 नेमणूक पोलीस स्टेशन सोयगांव उल्लेखनीय कार्य पोलीस अधिकारी व अमलदार यांनी सदर अवैध रित्या गांजाची लागवड करणाऱ्या इसमास ताब्यात घेऊन ३,१५,६५० . तीन लाख पंधरा हजार सहाशे पन्नास / रुपयाचा ६३ किलो १९० ग्रॅम गांजा जप्त केला होता या धाडसी कारवाई मुळे रविंद्र तायडे या कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचाऱ्याला औरंगाबाद जिल्हा ग्रामीण पोलीस अधिक्षक मनिष कलवानिया यांनी औरंगाबाद कार्यालयात सन्मानपूर्वक प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला व अभिनंदन सुध्दा केले.
त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीने औरंगाबाद ग्रामीण पोलीस दलाचा जनतेमध्ये आदर वाढला आहे. भविष्यात आपण अशीचच उल्लेखनीय कामगिरी करून महाराष्ट्र पोलीस दलाची प्रतिमा उंचावण्यास हातभार लावाल अशीही मनिष कलवानिया यांनी अपेक्षा व्यक्त केली.



# निराधार वृद्धांसाठी तुकाराम आश्रय वृद्धाश्रम ठरतोय वरदान : राजेंद्र लहाने

आधुनिक केसरी न्यूज




**चिखली :** माणुसकी सोशल फाउंडेशन संचालित भारत सरकार नोंदणीकृत राष्ट्रीय ग्राहक उपभोक्ता संरक्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे, राष्ट्रीय उपाध्यक्षा सौ. आशाताई पाटील, राष्ट्रीय सचिव हर्षद गायधनी, प्रदेश अध्यक्ष मंगेश मोहिते पाटील यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या बुलढाणा जिल्हाच्या वतीने तुकाराम आश्रय वृध्दाश्रम भोकर येथे सोलापुरी चादरीचे वाटप करण्यात आले. ऋणानुबंध समाज विकास संस्था,चिखली व्दारा संचालीत तुकाराम आश्रय वृध्दाश्रम भोकर येथील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन समाजसेवक संतोष कऱ्हाडे हे होते. प्रमुख मार्गदर्शक ग्राहक उपभोकक्ता संरक्षण समितीचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र लहाने तर प्रमुख उपस्थीतीत विदर्भ संघटक शिवाजी मोरे, जिल्हा अध्यक्ष राजीव जाधव, जाधव, जिल्हा सचिव विष्णु नवघरे, जिल्हा सहसचिव सुखदेव बोर्डे हे होते. भोकरगावामधे चिखली तालुक्यातील व परीसरातील निराधार, बेसहारा, घरातुन काढुन दिलेले, समाजातील उपेक्षीत वयोवृध्दांसाठी तुकाराम आश्रय वृध्दाश्रम वरदान ठरत आहे तसेच निराधार बेसहारा वृध्दांना आधार देऊन जगण्याची आशा देणारे वृध्दाश्रम म्हणजे तुकाराम आश्रय वृध्दाश्रम आहे.असे प्रतीपादन ग्राहक उपभोक्ता रक्षण समीतीचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र लहाने यांनी केले. तसेच वृध्दांच्या सेवेसोबतच भोकर गावातिल गरजु विदयार्थांना मोफत टिवीशन देण्यात येऊन शिक्षणाचे महत्व वाढविण्याचे काम सुध्दा करण्यात येत आहे. म्हणुन या तुकाराम आश्रय वृध्दाश्रमासाठी ग्राहक उपभोकक्ता संरक्षण समितीच्या वतीने भविष्यातही भरपुर मदत करण्यात येईल असे आश्वासन समीतीच्या वतीने देण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ रुपाली डोंगरदिवे तर आभार प्रदर्शन प्रशांतभैया डोंगरदिवे यांनी केले. यावेळी भास्कर वानखडे, समाधान डोंगरदिवे, भास्कर डोंगरदिवे, प्रियंका वानखडे, खुशी कऱ्हाडे, सृष्टी कऱ्हाडे, आचल डोंगरदिवे, नव्या घेवंदे आदी उपस्थीत होते.



# अलाना उर्दू माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची निसर्ग सहल



आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** विद्यार्थ्यांना निसर्गाविषयी आवड निर्माण व्हावी, निसर्गाच्या सानिध्यात राहून शिकण्याची संधी मिळावी, निसर्गात बागडता यावे, पक्षी, प्राणी, फळे, फुले, झाडे, वेली यांची प्रत्यक्ष अनुभूती मिळावी. विद्यार्थ्यांचे निसर्गाविषयीचे प्रेम वृद्धिंगत व्हावे, या हेतूने औरंगाबाद विभागातील शाळांनी निसर्ग सहलीचे आयोजन करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर साहेब यांनी केले होते त्या अनुषगांने अली अलाना उर्दु माध्यमिक विद्यालय कुंजखेडा ता.कन्नड, जि.औरंगाबाद या शाळेत शनिवार रोजी मु.अ.शरीफ बेग सरांच्या मार्गदर्शनाखाली निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते. निसर्ग सहलीचे आयोजन निसर्गरम्य परिसरामध्ये करण्यात आला निसर्ग सहलीतून विद्यार्थ्यांना प्राणी, पक्षी, फळे, फुले, विविध वनस्पती, डोंगर, टेकड्या त्यांची वैशिष्ट्ये इत्यादीची माहिती दिली गेली. निसर्ग सहल यशस्वी करण्यासाठी इकबाल अन्सारी, झहीर पटेल, साजिद अली, मोबिन पटेल, अताउल्लाह खान, वसीम खान, नजमुस्सहेर, फायका नसरीन, नगमा शादाब व शिक्षकेतर कर्मचारी इब्राहीम खान, अतिक शेख यांनी परिश्रम घेतले.



# पैठण येथे बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अरोग्य शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** हिंदुरुदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पैठण येथे विलास बापू प्रतिष्ठान आयोजित आरोग्य शिबिर घेण्यात आले तसेच शांतिब्रह्म संत एकनाथ महाराज मंदिर येथे महाआरती करण्यात आली.

यावेळी माजी सभापती विलासबापू भुमरे यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच मुंबई महानंदचे संचालक नंदलाल काळे, नाथ संस्थानचे बाजीराव बारे, संभाजी सव्वाशे, संतोष सव्वाशे, राजू गायकवाड, महिला आघाडीच्या ज्योती काकडेसह बाळासाहेबांची शिवसेना तसेच शिवसैनिक पदाधिकारी महिला आघाडी कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.

# एमआयटी ज्यू. कॉलेजचा फिएस्टा 2023 उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल ज्यू. कॉलेजचा फिएस्टा 2023 शनिवार दिनांक 21 जानेवारी रोजी उत्साहात पार पडला. पंढरपूर तालुक्यातील व आसपासच्या अनेक शाळांनी यामध्ये सहभाग नोंदवून बक्षिसे व ट्रॉफी जिंकल्या. यामध्ये एग्रीकल्चर झोन, गेम झोन, सायन्स प्रोजेक्ट झोन, डान्स, वाद्य, गायन, इत्यादी मध्ये विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी सहभाग नोंदवला. यामध्ये विजयी विद्यार्थी व त्यांच्या शाळा खालील प्रमाणेः 1.हेमंत भांगे (सोलो साँग- प्रथम क्रमांक एमआयटी वाखरी)
2.सोहम तोरणे (सोलो साँग- द्वितीय क्रमांक हनुमान विद्यालय तोंडले) 3. कीर्ती नाईकनवरे (सोलो डान्स -हनुमान विद्यालय तोंडले प्रथम क्रमांक) 4. सहारा मोरे (सोलो डान्स- द्वितीय क्रमांक) 5. रेणुका विद्यालय बाबुळगाव (ग्रुप डान्स- प्रथम क्रमांक) 6. लोटस पब्लिक स्कूल पंढरपूर( ग्रुप डान्स- द्वितीय क्रमांक) 7. श्री मधुकर भांगे पालक (गायन)

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एमआयटी गुरुकुल चे सीनियर प्रिन्सिपल श्री अपु डे व ज्युनिअर कॉलेजच्या प्रिन्सिपल कार्तिश्वरि मॅडम तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




# विठ्ठलराव रटकलकर यांना उत्कृष्ट निवृत्त सेवा पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** सेवानिवृत्त केंद्रप्रमुख विठ्ठलराव रेवनसिद्धप्पा रटकलकर यांना महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन पुणेच्या वतीने पैठण येथे संदिपान भुमरे महाराष्ट्र शासन रोजगार हमी ग्रामीण योजना मंत्री यांच्या हस्ते उत्कृष्ट निवृत्त सेवा पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एन. डी. मारने (महाराष्ट्र पेन्शन असोसिएशन पुणे चे अध्यक्ष) व प्रमुख पाहुणे म्हणून द.मा. रेड्डी नांदेड जिल्हा अध्यक्ष, उपाध्यक्ष मीराखान साब उपस्थित होते. विठ्ठलराव रटकलकर हे सावरगाव (नसरत) ता. लोहा येथील मूळचे रहिवासी असून ता. माहूर येथील पंचायत समिती येथे केंद्रप्रमुख म्हणून 2010 मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्तीनंतर रटकलकर हे सेवानिवृत्त असोसिएशनचे उत्कृष्ट काम केले आहे म्हणून त्यांना महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन पुणे च्या वतीने पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी नांदेड येथून शेख हुसेन चौधरी, लक्ष्मणराव लंके, एस.एस. कुरुडे, गुलाम मुखत्यार कंधार, सादिक टेंभुर्णीकर हे पैठण येथील कार्यक्रमास उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल विठ्ठल राव रटकलकर यांचे धर्माबाद पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने शाल पुष्पहार देऊन अभिनंदन करण्यात आले आहे.





आधुनिक केसरी न्यूज

**स्वा. सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड येथे नेताजी सुभाषचंद्र बोस व स्व. बाळासाहेब ठाकरे जंयतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी उमेश जगताप विद्यासभा उपाध्यक्ष, दत्तात्रय तांबारे पर्यवेक्षक, प्रा. शशिकांत पसारकर अभ्यासपुरक उपक्रम प्रमुख, प्रा. विठ्ठल वाघिरकर व विद्यार्थी उपस्थित होते.**

# कोल्हापूर जिल्ह्यात भानमतीचा प्रकार सुरूच

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** ग्रामपंचायत निवडणुकीत बोकाळलेला भानमतीचा प्रकार अजूनही कोल्हापूर जिल्ह्यात सुरू आहे. कोल्हापूर शहरालगत असलेल्या सादळे-मादळे या जुळ्या गावात हा प्रकार उघडकीस आला आहे. एका कुटुंबातील तिघांच्या नावाने भानामती करण्यात आली आहे. ग्रामपंचायत निवडणुकीत भानमतीचा प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू होते. राजर्षी शाहू महाराजांच्या पुरोगामी कोल्हापुरच्या वैचारिक परंपरेवर प्रश्नचिन्ह लागले होते. अजूनही जिल्ह्यात भानामतीचे उद्योग सुरुच आहेत. करवीर तालुक्यातील सादळे मादळे गावात वडील आणि त्यांच्या दोन मुलांच्या नावाने उतारा टाकल्याचा प्रकार घडला आहे. विक्रम पाटील, निलेश पाटील आणि निखिल पाटील अशी नावे काळ्या बाहुल्यांवर लिहून उतारा टाकला आहे.
तथापि, संबंधित कुटुबांतील तरुणाने उताऱ्याजवळ जाऊन अशा आचरट प्रकारांना भीक घालत नाही , असे सांगत पुरोगामी विचारधारा जपली आहे. आम्ही सुशिक्षित माणसे आहोत. आजही लोक अंधश्रद्धेत जगतात.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# माजी गृहराज्यमंत्री बागवे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

## मातंग एकता आंदोलनाच्या वतीने घाटी रुग्णालयात मिठाई, फळ, ब्लँकेटचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्याचे माजी गृहराज्यमंत्री तथा मातंग एकता आंदोलन या राज्यव्यापी सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. रमेश दादा बागवे यांच्या वाढदिवसानिमित्त औरंगाबाद शहर व जिल्हा च्या वतीने विविध सामाजिक उपक्रम घेऊन गरजूंसाठी मदतीचे अभियान राबविण्यात आले.

या अभियानांतर्गत हडको होनाजीनगर येथील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह व श्री संत चोखामेळा मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह येथील विद्यार्थ्यांना गोड मिठाई व फळवाटप करण्यांत आले, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय घाटी रुग्णालयातील गोरगरीब रुग्ण व नातेवाईकांना फळवाटप करण्यांत आले तर शहरातील मुख्य रस्त्यांवर असणारे गोरगरीब वयोवृद्ध लोकांना ब्लॅंकेट वाटप करण्यात आले.

यावेळी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तथा माजी नगरसेवक राजू भाऊ आहिरे, मातंग एकता आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष संदीप मानकर, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा राजश्री साठे, शहराध्यक्ष किशोर तुपे, जिल्हा प्रवक्ता गजानन मानकर, शहर सचिव ज्ञानेश्वर निकाळजे, जिल्हा उपाध्यक्ष विजय आहिरे, जिल्हा संघटक भरत मानकर, संपर्कप्रमुख अंबादास पवार, पूर्व तालुकाध्यक्ष राहुल अंभोरे, विलास भालेराव, जिल्हा सहसचिव कैलास भालेराव, सिल्लोड तालुका उपाध्यक्ष सुरेश चंदनशिव, डॉ. काळे, वसतीगृह अधिक्षक कैलास साठे, अधिक्षक अंबादास वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते विलास खोतकर, सिल्लोड तालुकाध्यक्ष समाधान लोखंडे, अजिंठा सर्कल प्रमुख श्रीकांत मानकर आदींची उपस्थिती होती. तर संस्थापक अध्यक्ष मा.रमेश बागवे यांनी त्यांच्या जन्मदिनानिमीत्त संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी विविध गरजोपयोगी आणि जनहिताचे सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल औरंगाबाद कमिटीचे अभिनंदन व कौतुक केले.



# माऊलीच्या जन्मघराचे हेमाडपंथी मंदिरात रूपांतर

## माऊलीची जन्मभूमी श्री शेत्र आपेगाव एक धार्मिक पर्यटनस्थळ

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** ज्ञानेश्वर माऊलीच्या रूपाने महाराष्ट्राच्या ऐलतीरावर विश्वाच्या पैलतीरावरून माऊलीचे अवघे जीवन वाङःमय मानव मात्राला लाभलेले एक शांत शितळ अमृतसरोवर आहे. तिच्यामुळे महाराष्ट्र -जीवन सर्वार्थाने व सर्व परीने सर्वसुंदर, सर्वमंगल झाले त्या माऊलीचे दर्शन घेवू लागता तिचे वाङःमय तत्वज्ञान, चमत्कार, जन्मभूमी इत्यादीचे वाङःमयीन मंदिर जन्मभूमी आपेगावात मोठ्या थाटात सदगुरु विष्णू महाराज कोल्हापूरकर यांच्या संकल्पनेतून संस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर विष्णू महाराज कोल्हापूरकर यांनी अथक प्रयत्नातून उभे केले आहे. संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव, संत मुक्ताबाई यांचे जन्मगाव आपेगावी गोदावरीच्या तिरावर निसर्गाच्या सुंदर परिसरात चारी भावंडाचे जन्मघर हेमाडपंथी स्वरूपाचे मंदिर , गोदावरी तीरावर घाट, छोटेसे धरण पर्यटकाचे अकर्षन बनत आसल्याने अध्यात्मिक व धार्मिक शेत्रात पर्यटनाच्या दृष्टीने वारकरी सांप्रदायाचे व भाविकाचे पर्यटन स्थळ म्हणुन आपेगाव प्रसिद्ध आहे. गावात प्रवेश करताच संपूर्ण दगडाचे प्रवेशद्वार



व त्यावरील बारीक नक्षीकाम भाविकाचे लक्ष वेधून घेते. संत ज्ञानेश्वर महाराज यांचे जन्मघर आजही इथे पाहवयास मिळते. या मंदीरात माऊलीची सुंदर अशी मूर्ती तर दारात अजानवृक्ष, सुवर्णपिंपळ अशी दोन वृक्ष आहेत. ज्ञानेश्वर महाराजांनी लिहलेली सर्व ग्रंथ संपदा इथे उपलब्ध आहेत. प्रशस्त इमारत व पारायणाची सोय आसल्याने एकादशी व गुरुवार रोजी भाविक पर्यटकाची मोठी गर्दी असते. आपेगाव-पैठण विकास प्राधिकरणातून होणाऱ्या विविध विकास कामातून या तिर्थक्षेत्राचा चेहरा मोहरा बदलणार आसल्याने इथे सर्व सोई सुविधा लवकरच पुर्ण होणार आसल्याने आपेगाव हे पर्यटकांसाठी अभ्यासाचे केंद्र बिंदू मानले जाईल.

**संत ज्ञानेश्वर महाराजाच्या पणजोबाची मुळ समाधी आपेगावात**

संत ज्ञानेश्वराच्या प्रभावाने मराठी संस्कृती सजीव आणि सतेज झाली माऊलीच्या व्यक्तीमत्वाचे आणि सामाजिक, सांस्कृतिक व पारमार्थीक कर्तृत्वाचे दिव्य संजीवन महाराष्ट्र - जीवनाला लाभले आणि मराठी संस्कृती तेजस्वी अन सुगंधीत झाली मराठी मनाला, भाषेला अन साहित्याला नित्य संजीवन होवून राहीलेल्या ज्ञानेश्वर महाराजाचे पणजोबा भक्त त्रिबंकपंत या मुळ सत्पुरुषाची समाधी आपेगावात आसल्याने वारकरी सांप्रदायाला व ज्ञानेश्वर महाराजाच्या वाङमयाचा अभ्यास करणाराला व पर्यटकाला इथे चिंतनातून आनंद मिळतो.

पैठण-आपेगाव तिर्थक्षेत्र विकासातुन सुरू आहेत परंतु गेल्या काही वर्षांत निधी उपलब्ध असुनही शतपावलाने विकास कामे चालू आहे त्यामुळे पैठण च्या तुलणेत माऊलीच्या जन्मभूमीकडे विकासाच्या दृष्टीने दुर्लक्ष होतयं का हा प्रश्न वारकरी भाविक तथा गावकऱ्यांना पडलाय.

# प्रभाकर बागुल यांची भाजपा व्यापारी आघाडी उपाध्यक्षपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** औराळा येथील उत्कृष्ट व्यापारी तथा भारतीय जनता भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते प्रभाकर बागुल यांची भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडी उप तालुका निवड माजी विधानसभा अध्यक्ष व भाजपाचे जेष्ठ नेते हरिभाऊ बागडे भाजपा जिल्हाध्यक्ष विजय औताडे भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते भाजपा सचिव डॉ संजय गव्हाणे यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देऊन करण्यात आली. यावेळी भाजपा जिल्हाअध्यक्ष विजय औताडे साहेब, जिल्हाउपाध्यक्ष संजयजी खंबायते साहेब, माजी जिल्हापरिषद उपाध्यक्ष गायकवाड साहेब, जिल्हासचिव संजय गव्हाणे, तालुका अध्यक्ष भगवान कोल्हे, जिल्हा परिषद सदस्य किशोर आबा पवार, उत्तमराव राठोड ,शहर अध्यक्ष सुरेश डोळस, राजेंद्र गव्हाणे तालुका सरचिटणीस, सुभाष काळे, भगवान ठाकरे सुनील निकम, संजय चव्हाण, गणेश गुघे शिक्षक सेल तालुका अध्यक्ष, विलास इंगळे सर,प्रा संतोष शिरसाठ , अरुण थोरात प्रशांत अग्रवाल,कल्याण जंजाळ ,रामेश्वर मोरे,रमेश नागरे, सुदाम राठोड ,काकासाहेब आडे, बोर्डे सर,युनूस भाई, बाळू डगळे, शिवाजी बोरसे सर,शिवाजी गायकवाड सर,पाटील सर,प्रशांत शिंदे सर विलास पवार बाळासहेब निकम रामदास खवळे,कैलास जाधव , सुदान पवार पप्पु दवगे संजय मुगले सचिन पवार सर्व आघाडी प्रमुख व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. सर्व संस्थाचालक, सर्व शिक्षक, कार्यक्रमाचे संयोजक काकासाहेब तायडे, सहसंयोजक प्रदीप बोडखे, सुधाकर देवकर, सर्व उपस्थित शिक्षक मतदार, सर्वांचे आभार मानले.





# आदर्श शाळा व ग्रामगीता माध्य.मध्ये स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** आदर्श प्राथमिक व ग्रामगीता मा.विद्यालय पिंपळगाव वळण येथे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले कार्यक्रमाचे उद्घाटन आर.आर. पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष व मराठा क्रांती मोर्चा चे समन्वय विनोद नारायण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण उपसंचालक श्री अनिल साबळे साहेब औरंगाबाद विभाग तसेच माध्यमिक चे उपशिक्षणाधिकारी अशोक पाटील साहेब शिक्षण विभाग औरंगाबाद यांची उपस्थिती होती.

अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष काशीनाथ जाधव होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन करून झाली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कला सादर करून उपस्थितांचे मन जिंकले पाहुनण्याचे स्वागत खास मराठमोळ्या शैलीत ढोल ताशांच्या गजरात करण्यात आले मुली नववारी नेसून तर मूल कुर्ता पायजमा घालून प्रत्येकाचे स्वागत करत होते.. देशभक्ती, मराठ व हिंदी गाण्यांनी कार्यक्रमाला रंगत आणली तर नाटकांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले, कार्यक्रमाला परिसरातील खूप मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. यावेळी पंचक्रोशीतील सर्व सरपंच उपसरपंच तसेच सर्व लोकप्रतिनिधी यांची उपस्थिती होती.. स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले कार्यक्रमास श्री योगेश मिसाळ मा उपनगराध्यक्ष फुलंब्री तसेच शाळेच्या अध्यक्ष सौ. लता जाधव तसेच मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग तसेच प्रमुख उपस्थिती प्राध्यापक निळसर श्री वाघमारे सर सिद्दिकी सर , मेवाळ साहेब , हर्दे साहेब ,काळे माऊली , मोरे साहेब मानकापे साहेब राजेंद्र सोटम तांदळे साहेब विधाटे साहेब, साळुंखे, सांगळे सुखदेव अण्णा जाधव, बाबुराव पाटील जाधव, प्रभाकर शेळके, कडूबा सेठ गायकवाड, पत्रकार गणेश राव जाधव व नवनाथ ईधाटे केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचे स्वीय सहाय्यक ज्ञानेश्वर जाधव, वाणेगाव सोसायटीच्या चेअरमन शोभाबाई जाधव, प्रमुख पाहुण्याचे सत्कार अंकुश जाधव दीपक जाधव, गणेश जाधव, ज्ञानेश्वर जाधव, नामदेव जाधव समाधान जाधव भाऊसाहेब शिरसाट व अंकुश वाहाटुळे तसेच सहशिक्षक सचिन निर्मल अन्सारी शेख जीवन पवार, संदीप निधनकर, वैशाली तायडे, नीता गायकवाड, सविता लोखंडे यांनी मोलाचे सहकार्य केले सदर कार्यक्रमास भरपूर जनसमुदाय दिसून आला कार्यक्रम उत्साहात पार पडला सदर कार्यक्रम शिक्षण उपसंचालक श्री साबळे साहेब यांनी आपले मनोगत सादर केले त्यामध्ये त्यांनी उपस्थित जनसमुदायास सदर संस्थेबाबत आव्हान केले की ही संस्था श्री काशिनाथ जाधव यांनी ग्रामीण भागात संस्था काढून गरीब शेतकऱ्यांना मोलाचे सहकार्य केले आहे. सदर शाळेत मुला मुलींचे शिक्षण घेण्यासाठी आपल्याला जवळ असल्यामुळे त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे असे त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना म्हटले आहे. विनोद पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना मुलांनी चांगल्या प्रकारे शिक्षण करावे व जास्त वेळ न घेता मुलांचा कार्यक्रम चांगला पार पाडावा असे आशीर्वाद दिले सदर कार्यक्रम फारच उत्सव पार पडला. प्रास्ताविक योगेश जाधव यांनी केले. सूत्रसंचालन शेख सर, निधोनकर यांनी केले तर आभार मुख्याध्यापिका सौ अश्विनी जाधव मॅडम यांनी मानले.

# सावकाराच्या जाचामुळे शेतकऱ्याची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**भोर :** सावकाराच्या जाचामुळे एका शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भोर तालुक्यातील कुरुंगवडी गावात घडली. शेतकऱ्याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी बेकायदा सावकारी करणाऱ्या एकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सतीश बाजीराव शिळीमकर (वय ४३, रा. कुरुंगवडी, ता. भोर, जि. पुणे) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. शिळीमकर यांना आत्महत्येस प्रवृत्त करणे, तसेच बेकायदा सावकारी प्रकरणी अमृत महादेव शिळीमकर (रा. तांभाड, ता. भोर, जि. पुणे) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सतीश शिळीमकर यांची पत्नी वैशाली यांनी या संदर्भात राजगड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अमृतने सतीश यांना व्याजाने पैसे दिले होते. अमृत त्यांना व्याजासाठी त्रास देत होता. अमृतचा तगादा आणि धमक्यांमुळे सतीश यांनी शेतातील झाडाला दोरी बांधून गळफास घेतला.

# नादांतांडा येथे हरभरा पिकाची शेतीशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नादांतांडा येथे तालुका कृषी अधिकारी कार्यालय सोयगाव व आत्मा विभाग सोयगाव अंतर्गत मौजे नादांतांडा येथे हरभरा पिकाची शेतीशाळा तालुका कृषी अधिकारी एस.जी.वाघ व मंडळ अधिकारी, आत्मा पर्यवेक्षक अमोल महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. सर्वप्रथम हरभरा पिकाचे निरीक्षण घेऊन पिकावर आढळणाऱ्या किडी यांची ओळख प्रत्यक्ष क्षेत्रावर करण्यात आली. पिकावर येणारी कीड व रोग यावरील उपाययोजना कश्या करण्यात याव्या याबाबत शेतकऱ्यांना मानसिंग भोळे, अर्जुन सुरडकर कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक अतुल पाटील कृषी सहायक यांनी मार्गदर्शन केले. हरभरा पिकाला फुले व घाटे लागण्याच्या अवस्थेत आहे. हरभरा पिकाचे एकात्मिक



किड नियंत्रण करण्यासाठी एकरी ४-५ कामगंध सापळे लावावे जेणेकरून आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्या नंतर उपाययोजना करता येतील. गरजेनुसार कीटकनाशकांची फवारणी करावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन कृषी सहायक विजयसिंह राजपूत,विश्वजीत तायडे यांनी केले. अमोल महाजन कृषि सहाय्यक यांनी महाडीबीटी अंतर्गत योजनांची सविस्तर माहिती दिली. समूह सहायक चेतन सावंग यांनी पोक्रा योजनेची माहिती दिली. कार्यक्रमाकरिता नादांतांडा येथील माजी सभापती धरमसिंग चव्हाण, मेघराज चव्हाण अशे बहुसंख्य गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.अशी माहिती सोयगाव कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख यांनी बोलताना सांगितले.